


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६





मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९४ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com

# रोज तीन शेतकऱ्यांच्या आत्महत्या; राज्य सरकारची कबुली

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्यात अलीकडच्या काळात सुमारे सहा हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. पश्चिम विदर्भ व मराठवाडा विभागात गेल्या वर्षभरात १ हजार ९८७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून, या विभागात दररोज सरासरी ३ शेतकऱ्यांनी आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक कबुली राज्य सरकारने विधानसभेत दिली. वाढता उत्पादन खर्च, कर्जबाजारीपणा, सततची नापिकी, शेतीमालाला हमी भाव न मिळणे, निसर्गाच्या लहरीपणामुळे होणारे नुकसान तसेच अपुऱ्या



शासकीय मदतीमुळे शेतकऱ्यांवर मानसिक ताण वाढणे, बँकांच्या जाचक अटी व कर्जवसुलीच्या तगाद्यामुळे शेतकरी आत्महत्यासारखे टोकाचे पाऊल उचलत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे कर्जबाजारीपणा किंवा आर्थिक अडणीमुळे आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. मात्र तरीही शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यात सरकारला अद्याप अपेक्षित यश मिळालेले नाही. राज्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्येबाबत विधानसभेत सुलभा खोडके, अब्दुल सत्तार, अनिल पाटील, जयंत पाटील, अमित देशमुख, अतुल भातखळकर आदी सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नावर दिलेल्या लेखी उत्तरात पश्चिम विदर्भ व मराठवाडा विभागात दररोज तीन शेतकरी आत्महत्या करीत असल्याची कबुली देण्यात आली. राज्यात विशेषतः पश्चिम विदर्भातील २००९ शेतकऱ्यांनी तर मराठवाड्यात ११२९ शेतकऱ्यांनी तसेच जळगाव जिल्हयात २,७८३ शेतकरी आत्महत्या झाल्याची नोंद असून सन २०२५ मध्ये सर्वाधिक २०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद झाल्याची सरकारने मान्य केले आहे. चालू आर्थिक वर्षात पश्चिम विदर्भ व मराठवाडा विभागात १ हजार ९८७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून या विभागात दररोज सरासरी ३ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याबाबत कर्जमाफी, आपत्ती निवारण आराखडा राबविणे, हमीभाव, पीक विमा, मानसिक आरोग्य सहाय्य यांसारखी प्रभावी योजना करण्याबाबत सरकारकडून कारवाई केली जात असून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना एक लाखाची मदत केली जात असल्याचे मदत व पुनर्वसनमंत्री मकरंद जाधव यांनी लेखी उत्तरात नमूद केले आहे.

## कर्जफेडीसाठी शेतकऱ्याने मूत्रपिंड विकले

चंद्रपूर जिल्ह्यातील अल्पभूधारक शेतकऱ्याची कर्जाच्या परतफेडीसाठी किडनी काढण्याच्या घटनेची सरकारने गंभीर दखल घेतली असून या प्रकरणी आरोपींना मोक्का लावण्यासंदर्भात विचार केला जाईल. तसेच आरोपींची मालमत्ता जप्त करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिल्याची माहिती गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दिली.

# बड्या प्रकल्पांचा मुंबई महापालिकेवर बोजा



**मुंबई: (समर्थ गांवकरी)**

पालिकेच्या मोठ्या प्रकल्पांची व विविध विकासकामांची देणी २ लाख ४४ हजार कोटींच्या पुढे गेली असून, येत्या आर्थिक वर्षात ४१ हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. तर उर्वरित दायित्वे पुढील चार-पाच वर्षांत महापालिकेला द्यावी लागणार आहेत. पालिकेच्या एकूण मुदत ठेवी जानेवारी २०२६ अखेरीस ८१ हजार ४४९ कोटींपर्यंत असून त्यातील २८,०६० कोटी या करता वापरले जाणार आहेत. त्यापैकी १३,७६५ कोटी हे तात्पुरते अंतर्गत कर्ज म्हणून घेतले जाणार आहेत, तर १४,२९५ कोटी रुपये प्रकल्पांसाठी वापरले जाणार आहेत. मुंबई महानगरपालिकेचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प बुधवारी पालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी स्थायी समितीला सादर केला. या प्रकल्पात कोणत्याही नवीन प्रकल्पांची घोषणा करण्यात आलेली नाही. मात्र आधीच्याच प्रकल्पांची प्रचंड देणी पालिकेवर असून या कर्जाच्या ओझ्याखाली मुंबई महापालिका दबली असल्याचेच चित्र आहे. सागरी किनारा मार्गाचा उपनगरातील टप्पा, जलबोगद्यांची कामे, गोरेगाव-मुलुंड जोडरस्ता, रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाची कामे, पुलांची कामे अशा मोठमोठ्या प्रकल्पांबरोबरच दैनंदिन देखभालीच्या कामांची देणी यात समाविष्ट आहेत. हे प्रकल्प चार-पाच वर्षे चालणारे असून ही देणी मुंबई महापालिकेला येत्या चार-पाच वर्षांत द्यावी लागणार आहेत. महापालिकेतील प्रकल्पांची देणी २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात १.९० लाख कोटी होती, तर २०२४-२५ च्या आर्थिक वर्षात वाढून २,३२,४१२ कोटींवर गेली आहेत. हे दायित्व आता २ लाख ४४ हजार कोटींवर गेले आहे. हा खर्च भागवण्यासाठी ठेवी वापरण्यात येणार आहेत. पालिकेने २०२६-२७ या आर्थिक वर्षात भांडवली खर्चासाठी ४८,१६४ कोटींची तरतूद केली आहे. मात्र हा सगळा खर्च मुदत ठेवी आणि राखीव निधी यातूनच केला जाणार आहे.




## थोडक्यात...

### पवारांच्या अपघाताची SIT चौकशी करा

मुंबई (समर्थ गांवकरी) : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूची विशेष तपास पथकामार्फत (एसआयटी) चौकशी करण्याचे आदेश देण्याच्या मागणीसाठी बुधवारी उच्च न्यायालयात जनहित याचिका करण्यात आली. ही चौकशी न्यायालयाच्या देखरेखीखाली करण्याचेही याचिकेत म्हटले आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी ही याचिका केली असून लवकरच त्यावर सुनावणी अपेक्षित आहे. अजित पवार याचा विमान अपघातात मृत्यू होण्यापूर्वीच्या काही तासांत घडलेल्या आणि मृत्यूनंतर समोर आलेल्या बाबींवर या याचिकेत अनेक प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. याचिका दाखल करण्यापूर्वी आपण माहिती अधिकारांतर्गत नागरी उड्डाण संचालनालय (डीजीसीए) आणि मुख्यमंत्री कार्यालयाला ई-मेल पाठवून काही बाबींबाबत विचारणा केली होती. मात्र, त्यावर कोणतेही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने याचिका केल्याचे तिरोडकर यांनी याचिकेत नमूद केले.

### अधिकाऱ्यांची मनमानी वाढणार!

मुंबई (समर्थ गांवकरी) : जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकींमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी उमेदवारी अर्जासंदर्भात दिलेल्या निर्णयाविरोधात आता न्यायालयात आव्हान देता येणार नाही. त्यासंदर्भातले महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम (सुधारणा) 1961 विधेयक कोणत्याही चर्चेविना बुधवारी विधानसभेत बहुमताने मंजूर करण्यात आले.






# शेतकऱ्यांना गंडा घालणारा भामटा जेरबंद

## खर्डा पोलिसांची मोठी कारवाई

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

ऊसतोडणी हंगामासाठी मजूर पुरवण्याचे आमिष दाखवून शेतकऱ्यांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या भामट्याला छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून पकडण्याची धडाकेबाज कारवाई खर्डा पोलिसांनी पार पाडली. अटकेतील आरोपी हा जळगाव जिल्ह्यातील असून त्याने जामखेडसह सोलापुर व बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना गंडा घातल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. जामखेड तालुक्यातील वाकी येथील शेतकरी हरिदास तुकाराम शेळके, दादा सौदागर कोरडे, राजकुमार अर्जुन सावंत, वाल्मिक शंकर पवार आणि राहुल मनोहर रोडे यांना २०२५-२६ च्या गळीत हंगामासाठी मजुरांची आवश्यकता होती. याचाच फायदा घेत आरोपी जाधवराव चंदन परदेशी (रा. घुसर्डी खु., ता. भडगाव, जि. जळगाव) याने या शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला. केवळ शब्दावरच नव्हे, तर चक्क १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर नोटरी करून त्याने मजुरांच्या टोळ्या देण्याचे आश्वासन दिले. या बदल्यात त्याने शेतकऱ्यांकडून वेळोवेळी रोख आणि फोन-पे द्वारे एकूण ३८ लाख १५ हजार रुपये उकळले. मात्र, पैसे घेऊनही एकही मजूर न देता त्याने आपला फोन बंद केला आणि तो फरार झाला होता.

फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शेतकऱ्यांनी खर्डा पोलीस स्टेशनमध्ये धाव घेतली. १० फेब्रुवारी २०२६ रोजी याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS)




२०२३ च्या कलम ३१६(२) आणि ३१८(४) नुसार गुन्हा (रजि. नं. १९/२०२६) दाखल करण्यात आला.

सहाय्यक पोलीस निरीक्षक उज्वलसिंह राजपूत यांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवली. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी जाधवराव परदेशी हा नागद (ता. कन्नड, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे लपून बसल्याचे समजले. पोलिसांनी सापळा रचून त्याला तिथून ताब्यात घेतले. प्राथमिक चौकशीत धक्कादायक माहिती समोर आली आहे. या आरोपीने केवळ जामखेडच नव्हे, तर करमाळा (जि. सोलापूर) आणि आष्टी (जि. बीड) येथील शेतकऱ्यांनाही मजूर देण्याच्या नावाखाली लाखो रुपयांना गंडा घातल्याचा कबुली दिली आहे. यावरून हे एक मोठे रॅकेट असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

ही कारवाई अहमदनगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविण लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डा पोलीस स्टेशनचे प्रभारी सपोनि उज्वलसिंह राजपूत, पोलीस अंमलदार संभाजी शेंडे, राहुल शिंदे, शशी म्हस्के, विष्णू आवारे, अशोक बडे आणि बाळू खाडे यांच्या पथकाने केली. सध्या या प्रकरणाचा पुढील तपास सपोनि उज्वलसिंह राजपूत हे करत आहेत. शेतकऱ्यांनी अशा प्रकारे अनोळखी व्यक्तींना मोठी रक्कम देताना सावध राहावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी डॉ. भारती ताई पवार

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

आदिवासी समाजातील नेतृत्वाला राज्य पातळीवर महत्त्व देणे ही काळाची गरज होती. डॉ. पवार यांच्या निवडीमुळे पक्ष संघटन अधिक बळकट होईलच

उत्तर महाराष्ट्रातील राजकीय घडामोडींमध्ये महत्त्वपूर्ण पाऊल टाकत माजी केंद्रीय मंत्री Dr. Bharati Pawar यांची भारतीय जनता पक्षाच्या उत्तर महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तब्बल आठ महिन्यांच्या कालावधीनंतर प्रदेश कार्यकारिणी जाहीर झाली असून, या नव्या जबाबदारीमुळे पक्ष संघटनेत नवचैतन्य संचारले आहे.

सामान्य कार्यकर्त्यांपासून ते वरिष्ठ पदाधिकाऱ्यांपर्यंत सर्व स्तरांवर या निवडीचे स्वागत होत आहे. पक्ष नेतृत्वाने डॉ. पवार यांच्यावर दाखवलेला विश्वास हा त्यांच्या सातत्यपूर्ण कार्य, संघटन कौशल्य आणि



जनसंपर्काच्या बळावरच असल्याचे बोलले जात आहे. उत्तर महाराष्ट्रातील ग्रामीण भाग, आदिवासी पट्टा आणि शेतकरी वर्गाशी असलेली त्यांची जवळीक आता संघटन विस्तारासाठी महत्त्वाची ठरणार आहे.

नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना डॉ. भारती पवार म्हणाल्या "माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्तीला पक्ष नेतृत्वाने इतकी मोठी जबाबदारी दिली, ही माझ्यासाठी अभिमानाची आणि प्रेरणेची बाब आहे. ही जबाबदारी मी प्रामाणिकपणे, संघटन बळकट करण्यासाठी आणि तळागाळातील कार्यकर्त्यांना न्याय देण्यासाठी पार पाडेन." त्यांच्या या शब्दांत नम्रता आणि कर्तव्यनिष्ठेची जाणीव स्पष्टपणे दिसून .नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना डॉ. भारती पवार म्हणाल्या

ग्रामपंचायत कुंडाणे ओ चे उपसरपंच रवींद्र आहेर यांनी सांगितले, "डॉ. भारती ताई पवार यांच्यावर पक्षाने मोठी जबाबदारी दिली आहे. आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांना आता खऱ्या अर्थाने न्याय आणि हक्काची जागा मिळेल, असा विश्वास निर्माण झाला आहे .ग्रामपंचायत कुंडाणे ओ चे उपसरपंच रवींद्र आहेर यांनी सांगितले.

# बाभुळवाडेचे सुपुत्र गणेश दादा खणकर यांचा भव्य नागरी सत्कार सोहळा संपन्न होणार

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

पारनेर तालुक्याचा अभिमान आणि बाभुळवाडे गावचे सुपुत्र श्री. गणेश दादा खणकर यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (BMC) भाजप सभागृह नेतेपदी निवड झाल्याबद्दल, त्यांच्या गौरवार्थ शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६ रोजी बाभुळवाडे येथे भव्य नागरी सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्याचे अध्यक्षपद पारनेर-नगर मतदार संघाचे आमदार श्री. काशिनाथ दाते सर भूषवणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून भाजप प्रदेश उपाध्यक्ष मा. श्री. सुजयदादा विखे पाटील उपस्थित राहणार आहेत. तसेच, भाजपचे राज्य परिषद सदस्य मा. श्री. विश्वनाथ दादा कोरडे आणि अहिल्यानगर भाजपचे जिल्हाध्यक्ष श्री. दिलीपजी भालसिंग,



जिल्हा सरचिटणीस सुभाषराव दुधाडे, जिल्हा महिला उपाध्यक्ष अश्विनीताई थोरात,मंडल अध्यक्ष राहुल शिंदे पाटील, किसनराव शिंदे, शिवाजी काका खिलारी, सचिन वराळ पाटील व पंकज कारखिले यांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमाला लाभणार आहे.

कार्यक्रमाचा तपशील:
दिनांक: शनिवार, २८ फेब्रुवारी २०२६
वेळ: सकाळी ९:३० वाजता
स्थळ: माता मळगंगा सभागृह, बाभुळवाडे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर.

बाभुळवाडे ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात सर्व ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सोसायट्यांचे अध्यक्ष व संचालक, श्री केदारेश्वर सेवाभावी ट्रस्ट व पतसंस्थेचे पदाधिकारी तसेच समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. गणेश दादा खणकर यांनी मुंबईच्या राजकारणात मिळवलेल्या या मोठ्या यशामुळे संपूर्ण पारनेर तालुक्यात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सत्कार सोहळ्यास परिसरातील सर्व नागरिक, युवक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन बाभुळवाडे ग्रामस्थ आणि स्वागतोत्सुक कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**बेल्हे : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे,विद्यार्थी विकास मंडळ व समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने "Energy Audit and Management" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे नुकतेच करण्यात आले होते. कार्यक्रमावेळी प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांच्या हस्ते प्रा.दसपुते यांचा सन्मान करण्यात आला. या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.प्रमोदजी दसपुते यांनी ऊर्जेचे ऑडिट कसे करावे,त्याचे शास्त्रशुद्ध नियोजन कसे आखावे तसेच ऊर्जा संसाधनांचे प्रभावी व कार्यक्षम व्यवस्थापन कसे साध्य करता येईल तसेच ऊर्जा बचत, खर्च नियंत्रण, कार्यक्षमता वाढ आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने ऊर्जा ऑडिटचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले.

# चास शिवारात कोयत्यांचा धाक दाखवत प्रवाशांना लुटणारी टोळी अखेर जेरबंद

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर- पुणे महामार्गावर चास शिवारात कोयत्यांचा धाक दाखवत कारचालकाला बेदम मारहाण करून जबरी चोरी करणाऱ्या टोळीतील तीन आरोपींना नगर तालुका पोलिसांनी अवघ्या काही तासांत जेरबंद केले असून एक आरोपी अद्याप फरार आहे.

याबाबतची माहिती अशी की, दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पहाटे सुमारे ४.३० वाजता कोथरुळ (ता. माजलगाव, जि. बीड) येथील बालासाहेब काशीनाथ कदम व त्यांचा साथीदार पंकज श्रीराम कदम हे स्विफ्ट कार (एमएच १२ युएम २२४८) ने पुण्याकडे निघाले होते. कामरगाव शिवारातील हॉटेलजवळ शौचासाठी गाडी थांबवली असता, चार अनोळखी इसमांनी हातात कोयते घेऊन दोघांच्या गळ्याला शस्त्र लावले.

फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण करून त्यांना जबरदस्तीने




त्यांच्या गाडीत बसवून नगरकडे नेत असताना स्विफ्ट कारचा लझरी वाहनाशी अपघात झाला. या गोंधळाचा फायदा घेत आरोपींनी १८ हजार रुपये रोख, ५० हजार रुपये ऑनलाईन ट्रान्सफर, सुमारे ४७ हजार रुपये किमतीचा मोबाईल व इतर साहित्य असा एकूण १ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटला.

या प्रकरणी दि. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक तपास करण्यात आला.

तपासादरम्यान आरोपींना दैठणे गुंजाळ (ता. पारनेर) येथून अटक करण्यात आली. आरोपीमध्ये तुषार विजय उमाप, बुद्धभूषण संतोष आंग्रे (दोघे राहणार, दैठणे गुंजाळ, ता. पारनेर) तेजस लक्ष्मण उगलमुगले (रा. मनोरमा कॉलनी, नवनागापूर, अहिल्यानगर) तर चौथा आरोपी भो-या उर्फ विठ्ठल नवनाथ काळे (रा. गांधीनगर, अहिल्यानगर) हा फरार असून त्याचा शोध सुरू आहे. आरोपींकडून ८९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये ५,००० रुपये रोख, ५०,००० रुपये ऑनलाईन ट्रान्सफर, ३२,००० रुपये किंमतीचा वनप्लस मोबाईल चार्जर व जर्कीन, गुन्ह्यात वापरलेले लोखंडी कत्ती व कोयता जप्त करण्यात आला आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, सहाय्यक फोजदार दत्तात्रय हिंगडे, पोहेकॉ नितीन शिंदे, सुभाष थोरात, मंगेश खरमाळे, विक्रांत भालसिंग, नितीन शिंदे यांच्या पथकाने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली.

# पारनेर विकास योजनेला शासनमान्यता; आमदार काशिनाथ दाते सरांच्या पाठपुराव्याला यश

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पारनेर शहराच्या नियोजित आणि शाश्वत विकासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणारी "विकास योजना पारनेर" ही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 मधील कलम 31 (1) अन्वये अधिकृतपणे जाहीर करण्यात आली आहे. या सूचनेनंतर विकास आराखड्याची अंमलबजावणी कायदेशीरदृष्ट्या लागू होणार असून शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असल्याचे आ. दाते यांनी सांगितले. या विकास योजनेला शासनस्तरावर मान्यता मिळवून देण्यासाठी आपण सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. विविध स्तरांवर



बैठका, संबंधित विभागांशी समन्वय आणि आवश्यक त्या सूचना यामुळेच ही प्रक्रिया मार्गी लागली आहे. दि. ४ ते ९ सप्टेंबर २०२५ दरम्यान संबंधित फाईल मंत्रालयात विविध स्तरांवर वेगाने पुढे सरकली. ४ सप्टेंबर रोजी सहसचिव सुलेखा वैजापुरकर यांच्याकडे फाईल पोहोचली. ५ सप्टेंबर रोजी अपर मुख्य सचिव असीम गुप्ता यांनी तिची पाहणी केली. ८ सप्टेंबर रोजी उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे फाईल सादर झाली आणि त्याच दिवशी उपमुख्यमंत्र्यांचे सहसचिव व्यंकटेश भट यांची भेट आ. दाते यांनी घेतली. ९ सप्टेंबर रोजी अवर सचिव सुधीर शास्त्री यांच्याकडे पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या प्रत्येक टप्प्यावर आमदार दाते सर स्वतः मंत्रालयात उपस्थित राहून पाठपुरावा करत होते. प्रशासकीय स्तरावरील आवश्यक पूर्तता, स्पष्टीकरणे आणि समन्वय वेळेत पूर्ण झाल्यामुळे मंजुरीची प्रक्रिया गतिमान झाली.

दरम्यान, दिवंगत नेते अजितदादा पवार यांनीही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या योजनेच्या मंजुरीसाठी विशेष विनंती केली होती. दोन महिन्यांत मंजुरी देण्याचा शब्द शिंदे साहेबांनी दिला आणि तो पाळत विकास योजनेला शासनमान्यता मिळाली.

चौकट : विकास आराखड्याला मंजुरी मिळाल्याने पारनेरच्या भविष्यासाठी भक्कम पाया रचला गेला आहे. आमदार दाते सरांच्या प्रयत्नांमुळे शहराच्या वाढत्या गरजांना दिशा देणारी कायदेशीर चौकट तयार झाली. आता रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि सामाजिक प्रकल्प नियोजनबद्ध पद्धतीने राबविता येतील. हा निर्णय पारनेरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. **- युवराज पठारे, नगरसेवक पारनेर**

मंजूर विकास आराखड्यातील आरक्षणे, रस्ते, सार्वजनिक सुविधा, सामाजिक व पायाभूत सुविधा यांची तरतूद आता नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून शहराचा संतुलित आणि सुबक विकास साधता येणार आहे.

पारनेरच्या विकासाचा दीर्घकालीन रोडमॅप निश्चित करणारी ही योजना प्रत्यक्षात येणे हे शहरासाठी ऐतिहासिक पाऊल मानले जात आहे.

आमदार दाते सरांच्या विशेष प्रयत्नांमुळे पारनेर शहराच्या विकासाला कायदेशीर चौकट प्राप्त झाली असून आगामी काळात पायाभूत सुविधा, रस्ते, सार्वजनिक सोयी-सुविधा आणि नियोजित विस्ताराला गती मिळणार आहे.

पारनेरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आमदार दाते सरांचा हा पुढाकार निर्णायक ठरणार असल्याचे मत नागरिकांतून व्यक्त होत आहे.

पारनेर विकास योजनेला शासनमान्यता मिळणे हा शहरासाठी ऐतिहासिक क्षण आहे. आमदार काशिनाथ दाते सरांनी सातत्याने पाठपुरावा करून ही प्रक्रिया पूर्णत्वास नेली, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. या आराखड्यामुळे शहराचा नियोजित विकास होऊन पायाभूत सुविधांना नवी गती मिळेल. नागरिकांच्या अपेक्षांना न्याय देणारा हा निर्णय ठरेल.

**- अशोक चेडे,**
**नगरसेवक पारनेर**

# २८ फेब्रुवारी रोजी वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन

## पुरस्कार, सन्मान व चर्चासत्रांचा समावेश

**मुंबईप्रतिनिधी/वाशिम : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वाशिम येथील वैकुंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर, वाटाणे लॉन येथे २७ वे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार वितरण व पदाधिकारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांनी दिली.

स्थानिक वाटाणे लॉन येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पत्रकार संमेलनाचे उद्‌घाटन केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. सहउद्‌घाटक म्हणून महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहतील, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे राहणार आहेत. विशेष आशीर्वाद उपस्थिती म्हणून अयोध्या मंदिराचे कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य प.पू. रमाकांत व्यास उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष राजू भांदुर्गे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य संघटक संजय भोकरे, डिजिटल मीडिया अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष महेश पानशे, किशोर रायसाकडा, अशोक देडे, डॉ. अभय कुमार दांडगे, संपर्क प्रमुख वैभव स्वामी, कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे, विदर्भ प्रमुख नयन मोंढे, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरटे, नागपूर विदर्भ प्रमुख अनुपम कुमार भार्गव यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच विशेष अतिथी म्हणून सहकार मंत्री ना. आकाश फुंडकर, कॅबिनेट मंत्री ना. संजय राठोड, विभागीय अध्यक्ष सुनिल फुलारी, चर्मकार समाज जिल्हाध्यक्ष दिपक ढोके उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

**उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार जाहीर** : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने यंदाचे उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार २०२५–२६ जाहीर करण्यात आले आहेत. त्यामध्ये पुढील पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे :

- श्री. किशोर रायसाकडा (प्रदेश उपाध्यक्ष, पाचोरा – जळगाव) – उत्तर महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक
- श्री. नयन मोंढे (अमरावती) – विदर्भ अध्यक्ष, उत्कृष्ट संघटक
- श्री. राकेश खराडे (रायगड जिल्हाध्यक्ष) – कोकण विभाग उत्कृष्ट संघटक
- श्री. शंकर बोरघरे (चंद्रपूर–गडचिरोली जिल्हाध्यक्ष) – उत्कृष्ट संघटक
- श्री. अनुपम कुमार भार्गव (वर्धा) – नागपूर विदर्भ उत्कृष्ट संघटक
- श्री. वैभव स्वामी (प्रदेश संपर्कप्रमुख, बीड) – मराठवाडा उत्कृष्ट संघटक
- गणेश देवगावकर (जिल्हाध्यक्ष, सोशल मीडिया – वाशिम) – उत्कृष्ट संघटक
- नागेश आदापुरे (पंढरपूर) – पश्चिम महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक
- मा. दशरथ चव्हाण (जिल्हाध्यक्ष, नवी मुंबई) – उत्कृष्ट संघटक
- मा. पोपटराव गवांदे (इगतपुरी, नाशिक जिल्हा) – उत्कृष्ट संघटक

या सर्व मान्यवरांना अधिवेशनात सन्मानित करण्यात येणार आहे.

**चर्चासत्रे व प्रबोधन सत्रांचे आयोजन :** दुपारी २ ते ३ या वेळेत "पत्रकारांचा डीएनए काय? व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण होत आहे का?" या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये राज्य संघटक सिद्धार्थ भोकरे, ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे, प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकोडे आणि प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे सहभागी होणार आहेत. चर्चासत्राचे संचालन प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी करतील.

दुपारी ३ ते ४ दरम्यान पदाधिकारी सन्मान सोहळा पार पडणार असून ४ ते ५ या वेळेत द्वितीय प्रबोधन सत्र आयोजित करण्यात आले आहे. या सत्रात ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे "सायबर युगातील माध्यमे आणि मूल्यनिष्ठ पत्रकारिता" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

प्रबोधन सत्राचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी ॲड. सौ. भारती सोमाणी, प्रमुख अतिथी सौ. वृषाली टेकाळे राहतील. "संत विचारातून अभिव्यक्ती स्वातंत्र्य" या विषयावर प्रचार प्रमुख गोपाल कडू मार्गदर्शन करणार आहेत.

सभाध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज वाघ, उद्‌घाटक दामोदर पाटील गुरजी आणि विशेष अतिथी बाबाराव पाटील उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमात सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. अधिवेशनास मोठ्या संख्येने पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक आ. शाम खोडे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, निलेश सोमाणी, स्वागताध्यक्ष गिरधारीलाल सारडा, मुख्य समन्वयक डॉ. हरिष बाहेती, सहस्वागताध्यक्ष देवेंद्र खडसे पाटील, कार्याध्यक्ष शिवाजीराव वाटाणे, ॲड. भारती सोमाणी, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, कार्याध्यक्ष अभय खेडकर, विभाग अध्यक्ष सुनिल फुलारी, जिल्हाध्यक्ष किरण क्षार, शहर जिल्हाध्यक्ष पप्पु घुगे, इलेक्ट्रॉनिक मीडिया जिल्हाध्यक्ष राम धनगर, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष गणेश देवगावकर, डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष कैलास महाजन यांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

याशिवाय विदर्भ समन्वयक मोहित कर्नावट, उपाध्यक्ष संजय कडोळे, प्रदेश सदस्य पंकज सोनोने, रवि अंभोरे, नारायण आरू, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती जिल्हाध्यक्ष प्रफुल बानगावकर, जिल्हा उपाध्यक्ष समीर देशपांडे, अमोल अघम, संतोष गुल्हाणे, राजकुमार ठाकूर, संजय राठी, शाम अपूर्वा, बंडू राठोड, शिवाजी खडसे, ॲड. सुरेश टेकाळे, सौ. वृषाली टेकाळे, गोरखनाथ भागवत, विजय घोंगडे आदींची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वाराला विदर्भ केसरी स्व. ब्रजलाल बियाणी यांचे नाव देण्यात आले असून परिसराला वैकुंठधामवासी सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी यांचे नाव देण्यात आले आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनाद्वारे पत्रकार संघटनात्मक बळकटी, पत्रकारांच्या समस्या, बदलते माध्यमविश्व आणि मूल्यनिष्ठ पत्रकारितेवर व्यापक चर्चा होणार असल्याने राज्यभरातील पत्रकारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

# भारताला सेमिकंडक्टर स्वातंत्र्याची गरज : प्रा. डॉ. मंगेश कराड

## एमआयटी एडीटी विद्यापीठात 'सेमिकंडक्टर तंत्रज्ञानावर' राष्ट्रीय परिसंवाद उत्साहात

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

सध्या भारत ९४ टक्के सेमिकंडक्टर चिप्स इतर देशांतून आयात करतो. त्यामुळे आपला देश अद्यापही सेमिकंडक्टर तंत्रज्ञानासाठी परावलंबी आहे. सेमिकंडक्टरमध्ये मक्तेदारी असलेल्या देशांनी आपल्याला सेमिकंडक्टर चिप्सचा पुरवठा बंद केल्यास भविष्यात भारताची मोठी कोंडी होऊ शकते. त्याचमुळे भारत सरकारने पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली सेमिकंडक्टर मिशनची घोषणा केली आहे. त्याद्वारे भारतात सेमिकंडक्टर कंपन्या स्थापन करण्यासाठी तब्बल ७६,००० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे सेमिकंडक्टर क्षेत्रातील गुंतवणूक भविष्यात १,६०,००० कोटींपर्यंत वाढणार असून विद्यार्थ्यांना नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत, असे मत एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र-कुलपती प्रा. डॉ. मंगेश कराड यांनी व्यक्त केले. ते एमआयटी आर्ट, डिझाइन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड सायन्सेसतर्फे "सेमिकंडक्टर तंत्रज्ञान" या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिसंवाद आणि सेमिकंडक्टर तंत्रज्ञानातील 'सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई)' तसेच विद्यार्थ्यांच्या 'सेमिकंडक्टर क्लब (सेमी सी)' यांच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलत होते.




स्व. उर्मिला कराड सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बीईएल)चे कार्यकारी संचालक सूर्यनारायण मूर्ती, नेट्रा ॲक्सिलरेटर फाउंडेशनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक पवार, व्हीएसएलआय सोसायटी, बंगळुरूचे अध्यक्ष डॉ. सत्या गुप्ता, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, अधिष्ठाता डॉ. सुदर्शन सानप, डॉ. विरेंद्र शेटे, कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश माळी यांच्यासह देशभरातील उद्योगक्षेत्रातील मान्यवर, तज्ज्ञ, संशोधक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी सूर्यनारायण मूर्ती म्हणाले, सध्या भारतात सेमिकंडक्टर उत्पादनासाठी आवश्यक अत्याधुनिक उपकरणे, प्रक्रियात्मक क्षमता आणि तज्ज्ञ मनुष्यबळाची उपलब्धता इतर अग्रगण्य देशांइतकी प्रबळ नाही. यामुळे भारत अजूनही जपान, दक्षिण कोरिया, तैवान, अमेरिका व चीन यांसारख्या देशांवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

हे देश जागतिक सेमिकंडक्टर पुरवठा साखळीत अग्रेसर असून प्रामुख्याने तेच उच्च दर्जाच्या सेमिकंडक्टर चिप्सचे उत्पादन करतात. सध्या तैवानकडे तब्बल ६५ टक्के उत्पादन असून या क्षेत्रावर त्यांची मक्तेदारी आहे. त्यामुळे भारत इलेक्ट्रॉनिक्सही सरकारच्या सहकार्याने देशाचे याबाबतीतील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे.

# दोन गोळी सेंटरवर पोलिसांचा छापा

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड शहरातील बीड रोडवरील दोन गोळी सेंटरवर आर्थिक गुन्हे शाखा अहिल्यानगर व जामखेड पोलिसांनी छापा टाकून सुमारे 2 लाख 35 हजार रुपये कीमतीचा गुटखा जप्त करण्यात आला आहे. गोळी सेंटरच्या नावाखाली हा गुटखा विक्री करताना पोलिसांना सापडला आहे. या प्रकरणी दोन गोळी सेंटर चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जामखेड शहरातील बीड रोडवरील ग्रामिण रुग्णालयाच्या समोर जय भगवान बाबा गोळी सेंटर व जय भगवान गोळी सेंटर आशी दोन गोळी सेंटर आहेत. याठिकाणी गोळी सेंटरच्या नावाखाली अवैद्य गुटखा विक्री होत असल्याची माहिती आर्थिक गुन्हे शाखा अहिल्यानगर यांना मिळाली. या अनुषंगाने मंगळवार दि २४ फेब्रुवारी रोजी सकाळी




■ २ लाख ३५ हजाराचा गुटखा जप्त, दोघांवर गुन्हा दाखल

साडेअकरा वाजण्याच्या सुमारास आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने जामखेड पोलीसांच्या मदतीने घटनास्थळी आसलेल्या दोन्ही गोळीसेंटरवर छापा टाकला. यावेळी या दोन्ही दुकानात तंबाखू जन्य पदार्थांचे विक्री व तयार करण्यास प्रतिबंध असलेला गुटखा पानमसाला गुटखा असा एकुण २ लाख ३५ हजार ८४४ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यावेळी गोळीसेंटर चालक आरोपी छबू विश्वनाथ तोंडे, वय ६५ रा. सतेवाडी ता. जामखेड व निलेश श्रीराम कोल्हे वय ३५ रा. राजुरी, ता. जामखेड या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पो. कॉ कुलदिप घोळवे यांनी दिलेल्या फिर्यादी वरील दोन्ही आरोपींन विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरील घटनेचा तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा जाधव या करीत आहेत.

जामखेड शहरासह तालुक्यात अनेक भागातील गोळीसेंटरवर अवैद्य गुटखा तसेच आनेक ठिकाणी अवैद्य मावा विक्री होत असताना पहावयास मिळते. मात्र स्थानिक पोलीस याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष करित आहेत. अहिल्यानगर येथुन आर्थिक गुन्हे शाखेचे पथक जामखेडमध्ये येऊन अवैद्य गुटख्याच्या ठिकाणी कारवाई करते मग स्थानिक पोलीस काय करतात? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतुन विचारा जात आहे.

# शिवसेनेचे मावळचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची इंडिया–बाल्टिक पार्लमेंटरी फ्रेंडशिप ग्रुपमध्ये सदस्य म्हणून निवड!



**मावळ : (समर्थ गांवकरी)**

इंडिया–बाल्टिक पार्लमेंटरी फ्रेंडशिप ग्रुपमध्ये सदस्य म्हणून शिवसेनेचे मावळ मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची निवड झाल्याने मावळ तालुक्यात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ही निवड मावळसाठी सन्मानाची व ऐतिहासिक बाब मानली जात आहे.

खासदार बारणे यांनी आतापर्यंत संसदेतील प्रभावी मांडणी, विकासकामांतील सातत्य आणि जनसंपर्काच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या या निवडीमुळे भारत आणि बाल्टिक देशांमधील संसदीय संबंध अधिक दृढ होण्यास मदत होणार असून, आंतरराष्ट्रीय पातळीवर मावळचा ठसा उमटणार आहे.

या ऐतिहासिक क्षणी शिवसेनेचे खारघर शाखाप्रमुख व शिव उद्योग खारघर शहर प्रमुख रुद्राक्ष अनभवणे यांनी खासदार बारणे यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. "साहेबांच्या कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर नवी उंची लाभो आणि मावळच्या विकासाला अधिक गती मिळो," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

या निवडीमुळे शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, विविध स्तरांतून खासदार बारणे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मावळच्या जनतेसाठी ही अभिमानाची व गौरवाची क्षणिका ठरली आहे.

# कुस्तीगीर तरुणाचा मृत्यू

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मनमाड महामार्गावर कोपरगाव नजीक असलेल्या साईधाम पाटीजवळ सोमवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास एका भरधाव कंटेनरने दोन मोटारसायकलींना मागून जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात येवला येथील २० वर्षीय तरुण रोहन रवींद्र पगारे याचा कंटेनरचे चाक अंगावरून गेल्याने दुर्दैवी मृत्यू झाला. कुस्ती खेळून घराकडे परतणाऱ्या खेळाडूवर काळाने घाला घातल्याने येवला आणि कोपरगाव परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे येवला येथील रितेश सुनील भुसे (वय-२५) हे आपल्या मित्रांसह कान्हेगाव येथे आयोजित कुस्ती स्पर्धेसाठी गेले होते. स्पर्धा संपल्यानंतर रात्री ९ वाजेच्या सुमारास रितेश, शुभम सुकाशे आणि रोहन पगारे हे दोन वेगवेगळ्या दुचाकींवरून येवल्याकडे निघाले होते.

# परीक्षार्थ्यांना 'अति आवश्यक सेवा'; विद्यार्थ्यांना वेळेत मदतीचा हात

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

इयत्ता बारावी (विज्ञान शाखा) ची परीक्षा सुरू असताना वाहतूक व वेळेअभावी अडचणीत सापडलेल्या दोन विद्यार्थ्यांना स्वयंसेवकांनी तत्काळ मदत करत परीक्षा केंद्रावर सुखरूप पोहोचविल्याची घटना बुधवारी (दि. २५) घडली. जव्हार तालुक्यातील पाथर्डी येथील कु. रोहित मन्सूराम भोये व तुषार कैलास भोये हे विद्यार्थी शासकीय आश्रम शाळा हिरवे या परीक्षा केंद्रावर जाण्यासाठी निघाले असता त्यांना वाहनाची सोय उपलब्ध झाली नाही.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार गट) विद्यार्थी सेलच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचविले. विद्यार्थी सेलचे अध्यक्ष राहुल मधुकर घेगड यांच्या समन्वयातून ही मदत करण्यात आली. तालुका अध्यक्ष




संदीप माळी, युवक अध्यक्ष विनू मौळे, विध्यार्थी सेल उपाध्यक्ष रोहिदास वझरे, नानू गवळी आदी कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

दरम्यान, दहावी व बारावीच्या परीक्षांच्या पार्श्वभूमीवर 'अति आवश्यक सेवा' हा उपक्रम तालुक्यात राबविण्यात येत आहे. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना बस न मिळणे, गाडी चुकणे किंवा अन्य दळणवळण अडचणी निर्माण झाल्यास त्यांना थेट परीक्षा केंद्रापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी स्वयंसेवकांकडून स्वीकारण्यात आली आहे. कोगदा, डेंगाचीमेट, मालघर, पाथर्डी, देहेरे, दसकोड, बिवलधारा, सावरपाडा, मेढा, विनवळ, भोतडपाडा आदी गावांत संपर्क यंत्रणा उभारण्यात आली आहे. याआधी देखील चामीलपाडा येथील नकुल नडगे या विद्यार्थ्यालाही बससेवा उपलब्ध न झाल्याने अडचण निर्माण झाली होती. संबंधित विद्यार्थ्याच्या महाविद्यालयीन शिक्षिकेच्या संपर्कानंतर स्वयंसेवकांनी तातडीने प्रतिसाद देत त्याला वेळेत परीक्षा केंद्रावर पोहोचविले होते.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळणे व त्यांचे भवितव्य सुरक्षित ठेवणे हा उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे विद्यार्थी सेलच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या समाजोपयोगी उपक्रमाचे पालक, शिक्षक व नागरिकांकडून स्वागत होत असून, परीक्षाकालावधीत ही सेवा सुरू राहणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

# आदिवासी काँग्रेसच्या अध्यक्षपदी अरुण गोंदके यांची निवड

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुका आदिवासी काँग्रेसच्या अध्यक्षपदी अरुण गोंदके यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे तालुक्यातील आदिवासी समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

नवीन जबाबदारी स्वीकारताना अरुण गोंदके यांनी आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. जल, जंगल, जमीन या हक्कांचे संरक्षण, वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि शासकीय योजनांचा लाभ प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचविणे हे आपले प्रमुख ध्येय राहील, असे त्यांनी सांगितले.

युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, कौशल्य विकास शिबिरे आयोजित करणे तसेच विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक



सुविधा वाढविणे यावर विशेष भर दिला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. दुर्गम भागात आरोग्य सेवा मजबूत करणे आणि महिलांच्या सक्षमीकरणासाठी स्वयं-सहायता गटांना बळकटी देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

तसेच प्रत्येक गावात जनसंवाद साधून स्थानिक प्रश्नांचा तत्काळ पाठपुरावा करण्यात येईल, असे सांगून पारदर्शक व जनतेशी जोडलेले नेतृत्व देण्याचे आश्वासन गोंदके यांनी दिले.

अरुण गोंदके यांच्या नेतृत्वाखाली अकोले तालुक्यात आदिवासी काँग्रेसची संघटना अधिक बळकट होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. महाराष्ट्र प्रदेश आदिवासी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष वसंत पुरके यांच्या मान्यतेने व अहिल्यानगर जिल्हा आदिवासी काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर झडे यांच्या आदेशाने अरुण किसन गोंदके यांची अकोले तालुका आदिवासी काँग्रेस अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

आदरणीय राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने आदिवासी भागात पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. आदिवासी समाजापर्यंत काँग्रेसची विचारधारा पोहोचवण्यासाठी स्वतंत्र आदिवासी काँग्रेस युनिटची स्थापना करण्यात आली आहे. या माध्यमातून आदिवासींचे प्रश्न, हक्क आणि विकासाच्या मुद्द्यांना अधिक प्रभावीपणे आवाज मिळणार आहे.

राष्ट्रीय काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य नामदार बाळासाहेब थोरात, अहिल्यानगर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सचिन गुजर, अकोले तालुक्याचे ज्येष्ठ काँग्रेस नेते मधुभाऊ नवले,अकोले तालुका अध्यक्ष शिवाजी नेहे, गिरिजा पिचड,विजय पिचड यांनी निवड झाल्याबद्दल अभिनंदन केले व पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# मटका जोमात पोलीस कोमात ?

**बिलोली : (समर्थ गांवकरी)**

बिलोलीत अवैधरीत्या मटका जुगार जोमात पोलीस यंत्रणा कोमात ? या अवैध धंद्यावर प्रशासनाची लगाम लागणार का ? बिलोली शहरा सह अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात अवैध धंदे मटका जुगार अवैध वाळू उपसा यासह अनेक व्यवसाय खुले आम राजरोस पणे चालत आहेत मात्र या सर्व बाबी पोलीस प्रशासनाला माहिती असूनही या वर नियंत्रण का नाही तेरी भी चुप मेरी भी चुप असाच प्रकार नित्य निमाने चालु असल्याचे दिसून येते मात्र प्रशासनाचे डोळे उघडे कधी होणार उघडा डोळे बघा निट म्हणी प्रमाणे दिसतो. या परिसरातील सर्व सामान्य नागरीकांचे म्हणणे आहे कि हे अवैध व्यवसाय कायमस्वरूपी बंद केले पाहिजे कारण मटका चालकांच्या गैरव्यवहारावर अंकुश लावण्यासाठी प्रशासन काय कारवाई करेल.

# भारत सर्वात जास्त बोली भाषा बोलणारा देश

■ डॉ. रमेश गोपाळे

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे,अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय,ओतूर,येथे "जागतिक मातृभाषा दिन" मोठ्या आनंदी वातावरणात संपन्न झाला.अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रमेश शिरसाट व मराठी विभाग प्रमुख डॉ.वसंत गावडे यांनी दिली.

कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते सरस्वती पूजनाने व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.राजेश रसाळ यांनी केले. ते म्हणाले,"जगातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या मातृभाषेचा अभिमान वाटतो.त्यातूनच त्याच्या वर संस्कार होतात" डॉ.रमेश शिरसाट सर अध्यक्षीय मनोगतात म्हणाले,"मातृभाषेचा




अभिमान बाळगून तिचे जतन व संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

" विद्यार्थी प्रतिनिधी अर्णव बेनके व सूरज राजुरे यांनी विद्यार्थ्यांच्या वतीने मनोगत व्यक्त केले. या निमित्त डॉ.रमेश गोपाळे यांच्या "मराठीच्या विविध बोली ह्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. ते म्हणाले,"भारत सर्वात जास्त बोलीभाषा बोलणारा देश आहे. मातृभाषेचा वसा आणि वारसा पुढील पिढीसाठी मार्गदर्शक आहे. आपले आपल्या आईवर जेवढे प्रेम असते. तेवढेच मातृभाषेवर ही प्रेम करा."असा संदेश त्यांनी दिला. उपप्राचार्य डॉ.कल्याण सोनावणे डॉ.निलेश काळे, डॉ.रमेश काशिदे, प्रा.विद्या कोठावळे, प्रा.जनार्दन नाडेकर प्रा. अंकुश मोध्ये.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. राजेंद्र अंबावणे हे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ.रोहिणी मदने यांनी केले. आभार डॉ. विनायक कुंडलिक यांनी मानले.

# वैष्णवी विजय कवडे यशस्वी

## CSIR-NET-JRF परीक्षेत ऑल इंडिया क्रमांक ७९!

**डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)**

Council of Scientific and Industrial Research – राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) आणि कनिष्ठ संशोधन फेलोशिप (जेआरएफ) परीक्षेत वैष्णवी विजय कवडे हिने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. राष्ट्रीय स्तरावर घेण्यात येणाऱ्या या परीक्षेत तिने रासायनिक शास्त्र विषयात अखिल भारतीय क्रमांक ७९ मिळवून उत्तीर्णता मिळवली आहे. वैष्णवी ही गणोरे येथील महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय, गणोरे चे प्राचार्य श्री. कवडे सर यांची कन्या आहे. तिच्या या उज्ज्वल यशामुळे तिला पुढील पीएच.डी. शिक्षणासाठी भारत सरकारकडून शिष्यवृत्ती



मिळणार आहे. या यशाबद्दल संगमनेर महाविद्यालय तसेच महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालय परिवाराच्या वतीने तिचे विशेष अभिनंदन करण्यात आले. वैष्णवीच्या यशामुळे गणोरे परिसरासह संपूर्ण संगमनेर तालुक्याच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानाची भावना व्यक्त होत आहे.

# उदापूरला छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराचे लोकार्पण

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

उदापूर ता:-जुन्नर येथे श्री छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशद्वाराचा अर्थात ग्रामवेश लोकार्पण सोहळा दि:-१९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीला मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात व विविध धार्मिक कार्यक्रमात साजरा करण्यात आला. सह्याद्री गणेश मित्र मंडळाच्या प्रस्तावातून व अथक प्रयत्न आणि लोकसहभागातून अंदाजे २८ लाख रुपये खर्च करून या ग्रामवेशीचे चार वर्षांत निर्माण केले आहे. या वेशीच्या निर्माणासाठी उदापूरकर ग्रामस्थ, मुंबईकर,पुणेकर ग्रामस्थांनी उदार हस्ते देणग्या दिल्या. शिवजयंतीच्या मुहूर्तावर त्याचेच लोकार्पण सोहळा विद्यमान आमदार शरद सोनवणे,माजी




आमदार ॲड. दिलीप ढमढेरे,बाळासाहेब दांगट,ॲड. संजय काळे यांचे हस्ते व माजी जिल्हा परिषद सदस्य अंकुश आमले यांच्या अध्यक्षतेखाली झाले. याप्रसंगी सह्याद्री गणेश मंडळ व यशोदीप गणेश मंडळ उदापूर आणि शिवछत्रपती मंडळ कुलवडेमळा,युवा प्रतिष्ठान यांनी संयुक्तपणे शिवनेरीहून मशाल प्रज्वलित करून आणली. त्यानंतर शिवपालखीची मिरवणूक गावातून काढली.या

मिरवणुकीत अश्वनृत्य,तलवार बाजी दांडपट्टा,लाठी काठी आदी मर्दानी खेळ सादर करण्यात आले.

यामध्ये गावातील महिला बचत गटातील महिला व प्रियदर्शनी महिला मंडळाच्या जवळपास ५० महिलांच्या पारंपरिक वेशभूषेतील ढोल पथकाने व पुरुषांच्या लेझीम पथकाने शिवरायांना दिलेली मानवंदना सर्वांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरली.

तत्पूर्वी पहाटे २ वाजता श्री. छत्रपती शिवाजी महाराजां चा अभिषेक करण्यात आला यावेळी पौरोहित्य सुनिल डबीर यांनी केले.त्यानंतर सह्याद्री चौकातील शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला सोबतच शिवजन्मोत्सव पाळणा ओम चैतन्य भजनी मंडळाने गाऊन साजरा करण्यात आला.यावेळी अत्यंत रोमहर्षक आतशबाजीने नामफलकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते झाले.प्रसंगी या ग्राम वेशीच्या निर्मितीसाठी योगदान देणारे इंजिनिअर योगेश होंडे व मूर्तिकार संतोष ढवळे,तसेच कार्यक्रमाचे अन्नदाते यांचा सन्मान करण्यात आला.

तसेच शिवरायांची महाआरती झाली. या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य बबन तांबे,मोहित ढमाले,तुषार थोरात,माजी सभापती ज्योती शिंदे,पंचायत समिती सदस्या मनीषा डावखर, निलम आमले,उदापूरचे सरपंच सचिन आंबडेकर,ग्राम विकास मंडळाचे अध्यक्ष संजीव शिंदे, विद्या विकास मंडळाचे अध्यक्ष प्रभाकर शिंदे,श्रीराम देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तुळशीराम शिंदे, सचिव किशोर होनराव माजी सरपंच डॉ.प्रमिला शिंदे,माजी उपसरपंच डॉ.पुष्पलता शिंदे, सावता माळी मुंबईकर मंडळाचे अध्यक्ष विष्णू शिंदे,पुणेकर मंडळाचे अध्यक्ष शशिकांत आरोटे आदी उपस्थित होते. यावेळी भारतीय जनता पक्षाचे व विघ्नहर्ता देवस्थानचे माजी अध्यक्ष गणेश कवडे,कृषी उत्पन्न बाजार समिती संचालिका प्रियांका शेळके व महेश शेळके यांनीही या लोकार्पण सोहळ्या ला भेट दिली.

यावेळी कार्यक्रम प्रास्ताविक संजय ढमढेरे यांनी करून अध्यक्ष निवडीची सूचना केली त्यानंतर मोहन वल्हवणकर यांनी अनुमोदन देऊन सर्वांचे स्वागत केले कार्यक्रम नियोजन व सूत्रसंचालन साईनाथ भोर यांनी तर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व जेष्ठ पत्रकार रविंद्र भोर यांनी आभार मानले.

# राज्यस्तरीय पथक व आर्थिक मदत द्या : आ. काशिनाथ दाते

## संकरित गायींच्या मृत्यूंवर आमदार काशिनाथ दातेंचा पाठपुरावा

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

बुधवार दि. २६ फेब्रुवारी २०२६ पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघातील दैठणे गुंजाळ ता. पारनेर आणि हिवरे बाजार ता. नगर परिसरात संकरित गायींमध्ये अज्ञात आजाराचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी चिंतेत आहेत. गायी अचानक एक-दोन दिवसांत आजारी पडून दगावत असल्याने पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी



नगर विकास विभागाच्या सह सचिव श्रीमती. सुलेखा वैजापूरकर मॅडम यांना डी पी आर बाबत निवेदन देताना

तातडीने राज्याच्या पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडे यांना पत्र देवून त्वरित उपाययोजनांची मागणी केली आहे. यावेळी आ. विठ्ठलराव लंघे, आ. अमोल खताळ उपस्थित होते.

जिल्हास्तरीय पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासण्या केल्या असल्या तरी आजाराचे निश्चित निदान अद्याप झालेले नाही. त्यामुळे मृत्यूंचे प्रमाण वाढत असून ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवले आहे. पशुधन हेच उपजीविकेचे प्रमुख साधन असल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे.

शेतकऱ्यांच्या पशुधनाचे रक्षण व त्यांना आर्थिक दिलासा मिळावा यासाठी आमदार काशिनाथ दाते सरांनी घेतलेला हा पुढाकार महत्त्वपूर्ण ठरत असून प्रभावित भागातील ग्रामस्थांनी त्यांच्या हस्तक्षेपाबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

> शेतकऱ्यांचे पशुधन वाचविण्यासाठी राज्यस्तरीय तज्ञ पशुवैद्यकीय पथक तातडीने पाठवून आजाराचे निदान करावे, विशेष आरोग्य शिबिरे व लसीकरण मोहीम राबवावी, दगावलेल्या जनावरांचे पंचनामे करून "खास बाब" म्हणून आर्थिक मदत जाहीर करावी तसेच भविष्यातील प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात.
> **- आ. काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**



ठाणे : अखेर ६ तासांच्या प्रयत्नांना यश आले. ठाणे पूर्वेला मलनिस्सारण प्रकिया केंद्र बाजूला, कन्हैय्या नगर, कोपरी, या ठिकाणी वृक्ष प्राधिकरण विभागाच्या डम्पिंग ग्राउंडमध्ये पहाटे ३-४५ वाजता मोठ्या प्रमाणात आग लागली होती. सदर घटनास्थळी अग्निशमन अधिकारी, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, उपनगर अभियंता, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक, वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी व अग्निशमन दलाचे जवान ०२- फायर वाहन, ०३- हायराईझ वाहन ०१ - रेस्क्यू वाहन ८ वॉटर टँकर, १ जंबो वॉटर टँकर वाहनासह, २ जेसीबी तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी ०१- यूटीलीटी वाहन यांच्या मदतीने सकाळी १० वाजताच्या सुमारास आग आटोक्यात आणण्यास यश मिळाले. ( फोटो - संतोष पडवळ )

## थोडक्यात बातम्या...



### ग्रामस्थांचे ठिय्या श्री विकास जाधव यांच्या लेखी आश्वासनानंतर मागे

पारनेर (स. गांवकरी) : माळकुप येथील बचत गटाच्या ११५१८रुपये कर्जापोटी जमीन जप्त असतानाही गोरेश्वर पतसंस्थेने अनधिकृत रित्या जामीनदारांचे खाते गोठवले होते त्या विरोधात सहाय्यक निबंधक कार्यालयामध्ये माळकुप ग्रामस्थांनी तक्रार अर्ज दाखल केला होता त्या अर्जानुसार सहाय्यक निबंध कार्यालयामध्ये माळकूप ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन सुरू केले होते. पारनेर तालुक्यातील माळकुप येथील योगिता पोपट खांडके यांच्या बचत गटाने गोरेश्वर पतसंस्थेकडून कर्ज घेतले होते. थकबाकीमुळे गोरेश्वर पतसंस्थेने थकीत कर्जदार व जामीनदार यांच्यावर १०१ कारवाई सुरू केली. जामीनदारांच्या जमिनींवर बोजा चढवला गेला, म्हणजे जमीन जप्तीची प्रक्रिया सुरू झाली. पण तरीही पतसंस्थेने जामीनदारांच्या बँक खात्यांमध्ये अनधिकृतपणे गोठवणी केली. जमीन जप्त असताना लिलाव का नाही केला? आणि खाते गोठवण्याचा अधिकार पतसंस्थेला असतो का? असा प्रश्न महिलांनी उपस्थित केला. या कारवाईमुळे कर्जदार आणि जामीनदार आक्रमक झाले. त्यांनी सहाय्यक निबंधक कार्यालय, पारनेर येथे धाव घेतली. सहाय्यक निबंधक श्री विकास जाधव साहेब रजेवर असल्याने सहकार अधिकारी श्रेणी-१ राजेंद्र वाघमोडे यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या कार्यालयाकडून खाते गोठवण्याचे कोणतेही आदेश दिलेले नाहीत. ही कारवाई पतसंस्थेने स्वतः केली असावी. यावर महिलांनी बाचाबाची केली आणि अर्ज दाखल केला की, दोषींवर कडक कारवाई व्हावी. अन्यथा सर्व महिला आत्मदहन करतील आणि जबाबदारी निबंधक कार्यालयाची राहील, असे नमूद केले. होते. आज सहाय्यक निबंधकांनी पतसंस्थेकडून स्पष्टीकरण मागवणे गरजेचे आहे पुढील आठ दिवसात या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी असलेल्या पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.

### मुख्यमंत्री गाव समृद्धी पंचायतराज अभियानाची अनोखी जनजागृती

भिवंडी (स. गांवकरी) : मुख्यमंत्री गाव समृद्धी पंचायतराज अभियान अंतर्गत जनजागृतीसाठी भिवंडी तालुक्यातील रांजनोली ग्रामपंचायतिच्या वतीने जिल्हा परिषद रांजनोली मराठी शाळेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध जादूगार महेंद्र सोनावणे (एस. महेंद्रा) यांनी जादू प्रयोगाच्या माध्यमातून अभियानाची माहिती अत्यंत प्रभावी व मनोरंजनात्मक पद्धतीने सादर केली. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. तसेच विविध महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जादूगार महेंद्र सोनावणे यांनी आपल्या जादू प्रयोगातून गावाचा सर्वांगीण विकास, मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा, स्वच्छ व सुंदर तसेच प्लास्टिकमुक्त गाव निर्मिती, घनकचरा व्यवस्थापन, ग्रामस्वच्छता उपक्रम, ग्रामसभेद्वारे लोकसहभाग आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांवर प्रकाश टाकला. उत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामपंचायतींना पुरस्कार व प्रोत्साहन निधी, महिला बचत गट, युवक आणि नागरिकांचा विकासातील सहभाग तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्दिष्टांविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. "आजच प्लास्टिकला नकार द्या आणि पर्यावरण वाचवण्यासाठी कापडी पिशवीचा स्वीकार करा."

# भिंगार येथे छत्रपती शिवाजी महाराज भवनचे उद्घाटन

## शिवरायांचा आदर्श समोर ठेवून समाजहिताचे कार्य करावे - आ. संग्राम जगताप

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

"छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व धर्मीयांना सोबत घेऊन स्वराज्याची स्थापना केली. छत्रपती शिवरायांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपली जबाबदारी आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे भवन निर्माण करण्यासाठी शामराव वाघस्कर यांनी गेल्या तीन वर्षापासून पाठपुरावा केला आहे.भिंगार शहरातील छत्रपती शिवरायांचे स्मारक हे समाजासाठी प्रेरणादायी व दिशादर्शक असे आहे.

भिंगार शहरात उभारण्यात आलेले हे नूतन सभागृह सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांसाठी केंद्रबिंदू ठरेल. शिवरायांचा आदर्श समोर ठेवून समाजहिताचे कार्य करावे. असे प्रतिपादन आमदार संग्राम



जगताप यांनी केले आहे. भिंगार शहरात श्रीमंत योगी प्रतिष्ठाण व अखंड मराठा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंती व नूतन 'छत्रपती शिवाजी महाराज भवन' सभागृहाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.विविध सामाजिक उपक्रम व आरोग्य शिबिर घेण्यात आले.याप्रसंगी छावनी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सौ.पल्लवी विजयवंशी, भिंगार कॅम्प पोलिस स्टेशनचे पो.नि. जगदीश मुलगिर,छावनी परिषदेचे उपाध्यक्ष वसंत राठोड,मराठा सेवक गोरख दळवी,श्रीमंत योगी प्रतिष्ठाणचे प्रर्वतक शामराव वाघस्कर,अखंड मराठा समाज भिंगार अध्यक्ष राजेश काळे,श्री शिवाजी मराठा पंच मंडळ अध्यक्ष संपत बेरड, संभाजीराव भिंगारदिवे, महेश झोडगे,सुनील लालबोंद्रे, सादिक सय्यद,संजय सपकाळ, विनायक वाघस्कर, योगेश करांडे,प्रदीप जाधव,सुहास धीवर,मच्छिंद्र बेरड,प्रकाश कराळे,कर्डिले साहेब,प्रकाश लूणिया,विष्णू घुले,साहेबराव चौधरी, कैलासराव मोहिते, गजानन पाटील,मतीन सय्यद, नूर शेख,महेश नामदे,रवींद्र लाल बोंद्रे,कैलास वाघस्कर,मळूराज गाडेकर, पंकज चव्हाण,महेश चव्हाण, अंकुश शिंदे,गोरख चव्हाण, कैलास काटे,संजय छतिसे,बाळासाहेब भंडारी आदींसह श्रीमंतयोगी प्रतिष्ठानचे कार्यकर्ते व पदाधिकारी,भिंगार परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. महात्मा फुले चौक,अर्बन बँक येथून निघालेल्या शोभायात्रेने भिंगार शहरातील परिसर शिवमय झाला.मोफत अस्थिरोग आरोग्य शिबिरात जेष्ठ नागरिकांसह सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. शिबिरात विना ऑपरेशन,विना इंजेक्शन उपचार पद्धतीने तपासणी व मार्गदर्शन करण्यात आले.

# मातीच्या विल्हेवाटीसाठी डेडीकेडेट कॉरिडॉरचा आग्रह



**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गाच्या खोदाईदरम्यान निघणाऱ्या मातीच्या वाहतूकीवरून स्थानिक रहिवाशी आणि विकासकांमध्ये जुंपण्याची चिन्हे आहेत.मातीची विल्हेवाट लावण्यासाठी एमएमआरडीएने कन्व्हेयर बेल्टचा प्रस्ताव दिला मात्र ९० टक्के रहिवाश्यांची डेडीकेटेड कॉरीडॉरला (विशेष वाहतुक मार्गिका) सहमती आहे. या प्रकल्पाच्या मध्ये जी जागा आहे तेथुन मातीचे डंपर पास होणार असल्याने वाहतुकीचाही प्रश्न उदभणार नाही. असा दावा मंगळवारी पत्रकार परिषद घेऊन रहिवाश्यांनी केला. तसेच, महापालिकेने नोटीस बजावूनही काही विकासक जुमानत नसल्याने त्यांच्या विरोधात प्रशासनाने कारवाई करावी, अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशाराही या रहिवाश्यांनी दिला आहे.

# कोचाळे शाळेचा विद्यार्थी ओम गोविंद फसाळे गुणवंत विद्यार्थी



**पालघर : (समर्थ गांवकरी)**

पालघर जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी मा. मनोजजि रानडे साहेबाच्या संकल्पनेतून 2025-26 विविध पारितोषिक वितरण समारंभात जिल्हा परिषद iso शाळा कोचाळे शाळेचा इयत्ता सातवी मध्ये शिकणारा ओम गोविंद फसाळे याला गुणवंत विद्यार्थी म्हणून प्रमाणपत्र देऊन गौरवीन्यातआले. प्रत्येक तालुक्यातुन दोन विद्यार्थी अशी एकूण सोळा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती . यां मध्ये, स्पर्धा परीक्षा, विज्ञान प्रदर्शन सहभाग, जिल्हास्तर क्रीडा स्पर्धा, जिल्हा स्तर वीविध गुणदर्शन स्पर्धा अशा निकषातून विद्यार्थ्याची निवड करण्यात आली होती ओम हा शाळेतील हुशार वीद्यार्थी तसेच ओम प्रत्येक स्पर्धेत हिरीहीरीने सहभागी असतो. त्याची निवड झाल्याने ओम चे आणि पालकाचे सर्वत्र कौतुक होतं आहे. त्याला शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिनकर फसाळे, शिक्षक, राजाराम जोशी सर, गणेश वाघ सर आणि वर्गशिक्षक दिनेश ठोमरे सर यांचे मार्गदर्शन लाभले.

# इतिहासाची पुनरावृत्ती ! किनवटमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पुनर्जिवनातून हिंदू-मुस्लिम एकतेला पुन्हा उजाळा

- १९६२ मध्ये सरदार खान यांच्या नगराध्यक्षपदाच्या काळात उभारलेला पुतळा; आज सौ. सुजाता येंड्रलवार यांच्या कार्यकाळात नव्या पुतळ्याची उभारणी – नेम्मानिवार कुटुंबियांचे पुन्हा योगदान



मुकुंद नेम्मानिवार,
किनवट तालुका प्रतिनिधी,
दैनिक समर्थ गावकरी,
मोबाईल : 8805577792

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

किनवट शहराच्या मध्यवर्ती चौकात सुमारे सहा दशकांपासून दिमाखात उभा असलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा हा केवळ शिल्प नसून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा जिवंत इतिहास मानला जातो. या पुतळ्याच्या पुनर्जिवनाच्या निमित्ताने शहरात पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. सन १९६२ मध्ये किनवट नगर परिषदेत सरदार खान हे नगराध्यक्ष होते. त्या काळात सभागृह सदस्य म्हणून व्यंकन्ना पटेल (नेम्मानिवार) कार्यरत होते. व्यंकन्ना पटेल यांची आपल्या घराजवळ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवण्याची तीव्र इच्छा होती. त्यांनी पुढाकार घेत सर्व समाजघटकांना सोबत घेऊन शहराच्या मध्यवर्ती चौकात महाराजांचा पुतळा उभारला. विशेष म्हणजे, त्या वेळी मुस्लिम नगराध्यक्ष सरदार खान यांच्या कार्यकाळात हा पुतळा उभारला गेला, ही बाब किनवटच्या गंगा-जमुनी संस्कृतीचे प्रतीक म्हणून आजही अभिमानाने सांगितली जाते. सुमारे ६२ वर्षे हा पुतळा शहराच्या ओळखीचा केंद्रबिंदू ठरला. असंख्य शिवप्रेमींनी, विविध सामाजिक-धार्मिक संघटनांनी येथे अभिवादन केले, शिवजयंती उत्सव साजरे केले आणि राष्ट्रीय भावना जागृत ठेवल्या. आता या ऐतिहासिक स्थळी नव्या भव्य पुतळ्याची उभारणी करण्यात येणार आहे. योगायोग असा की, आज नगराध्यक्ष पदावर सौ. सुजाता विनोद येंड्रलवार (नेम्मानिवार) विराजमान आहेत. त्या व्यंकन्ना पटेल यांच्या लहान भावाच्या कन्या अर्थात त्यांच्या भाची आहेत. त्यामुळे ज्या कुटुंबाच्या पुढाकारातून १९६२ मध्ये पुतळा उभारला गेला, त्याच कुटुंबातील प्रतिनिधींच्या कार्यकाळात नव्या पुतळ्याची स्थापना होणार असल्याने "इतिहासाची पुनरावृत्ती" अशी भावना शहरवासीयांत व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर व्यंकन्ना पटेल (नेम्मानिवार) यांचे चिरंजीव तथा किनवटचे माजी नगराध्यक्ष दिपक नेम्मानिवार यांनी माध्यमांशी संवाद साधताना महत्त्वाची मागणी केली आहे. त्यांनी सांगितले की, नवीन भव्य पुतळा जुन्या नगर परिषद इमारतीच्या जागेत बसवावा, जेणेकरून तो अधिक आकर्षक आणि दृष्टीस पडणारा ठरेल. तसेच, जुन्या पुतळ्याच्या ठिकाणी जागा मोकळी न ठेवता तेथे छत्रपती शिवाजी महाराजांची लहान मूर्ती बसवावी, अशीही मागणी त्यांनी केली. दिपक नेम्मानिवार यांनी यावेळी सांगितले की, "हा विषय केवळ पुतळ्याचा नसून किनवटच्या सामाजिक ऐक्याचा, इतिहासाचा आणि भावनिक जडणघडणीचा आहे. सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन हा उपक्रम यशस्वी करावा."

एकीकडे १९६२ मधील ज्या कुटुंबाचे सदस्य सभागृहात होते व त्या काळात शिवरायांचा पुतळा उभारला जातो आणि आज पुन्हा त्याच कुटुंबाच्या वारशातून नव्या पुतळ्याची उभारणी होणे, हा किनवटच्या सामाजिक सलोख्याचा आणि परंपरेचा अभिमानास्पद अध्याय ठरत आहे. शहरातील शिवप्रेमी व नागरिक नव्या पुतळ्याच्या उभारणीकडे उत्सुकतेने पाहत असून, या निमित्ताने किनवटमध्ये पुन्हा एकदा "जय शिवाजी, जय शिवराय" च्या घोषणा दुमदुमण्याची चिन्हे दिसत आहेत.

# पिंपळगाव माथा येथील आगीत बाधित आदिवासी कुटुंबाला मायेचा आधार

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे सहकार्य!

- मेंगाळ कुटुंबाच्या दुःखात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा सहभाग; जीवनावश्यक साहित्याची मदत!
- महाशिवरात्रीला लागलेल्या आगीत सर्वस्व गमावले; पत्रकार संघाकडून तातडीची मदत!

**संगमनेर खुर्द (ता. संगमनेर): प्रतिनिधी, संजय गोपाळे : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील पिंपळगाव माथा येथील भरमखास वाडीत राहणाऱ्या आदिवासी कुटुंबातील सावळेराम रामभाऊ मेंगाळ यांच्या घराला महाशिवरात्रीच्या दिवशी दुपारच्या सुमारास अचानक आग लागून संपूर्ण संसार जळून खाक झाला. या दुर्घटनेत घरातील अन्नधान्य, कपडे, भांडीकुंडी व अन्य जीवनावश्यक साहित्य जळून नष्ट झाले. त्यामुळे मेंगाळ कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, संगमनेर शाखेच्या वतीने तातडीने मदतीचा हात पुढे करण्यात आला. कुटुंबाला गृहउपयोगी वस्तू, कपडे व इतर आवश्यक साहित्य देऊन मायेचा आधार देण्यात आला. या मदतवाटप कार्यक्रमामुळे मेंगाळ कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला.



यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, संगमनेर तालुका अध्यक्ष संजय गोपाळे, समन्वयक संजय फुलसुंदर, पिंपळगाव देपा येथील पोलीस पाटील भांगरे तसेच पत्रकार संघाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते मेंगाळ कुटुंबाला संसारोपयोगी साहित्य सुपूर्द करण्यात आले.

प्रसंगी डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ हा राज्यातील पत्रकार, शालेय विद्यार्थी तसेच दीनदुबळ्या घटकांसाठी वर्षातील बहुतांश दिवस विविध सामाजिक उपक्रम राबवत असतो. "कोणाच्या सुखात जरी सहभागी होता आले नाही तरी दुःखाच्या प्रसंगी संघ नेहमीच मदतीसाठी धावून जातो," असे ते म्हणाले.

संघाचे कार्य केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून आंध्र प्रदेश, केरळ, गुजरात, मध्य प्रदेश व गोवा या राज्यांतही संघाची सामाजिक बांधिलकी जपणारे उपक्रम राबवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच पिंपळगाव देपा येथील मेंगाळ कुटुंबाला कायमस्वरूपी घर उभारण्यासाठी संगमनेर व अकोला मतदारसंघातील आमदारांनी विशेष मदत करावी, असे आवाहनही डॉ. आरोटे यांनी यावेळी केले.

या उपक्रमासाठी संगमनेर शहरातील प्रसिद्ध डॉ. कुटे, अभियंता सानप, राजन दादा युवा मंच, अभियंता रजनीकांत कवडे, अभियंता सोमनाथ गोडसे आदींचे मोलाचे सहकार्य लाभले. स्थानिक ग्रामस्थांनीही पुढाकार घेत कुटुंबाला मानसिक आधार दिला. या सामाजिक कार्यामुळे पत्रकार संघाने समाजातील वंचित घटकांप्रती आपली संवेदनशीलता आणि बांधिलकी पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# शिष्यवृत्ती प्रश्नपत्रिकांच्या पातळीबाबत सुधारणा करा

## खासदार नीलेश लंके यांचे परीक्षा परिषदेला पत्र

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यात घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेच्या प्रश्नपत्रिकांबाबत राज्यभर विद्यार्थी, पालक व शिक्षकांकडून व्यक्त होत असलेल्या नाराजीच्या पार्श्वभूमीवर खासदार नीलेश लंके यांनी पुणे येथील महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदच्या आयुक्तांना पत्र पाठवून प्रश्नपत्रिकांच्या काठिण्य पातळी व स्वरूपाबाबत सुधारणा करण्याची मागणी केली आहे.

पत्रात नमूद केल्याप्रमाणे, शिष्यवृत्ती परीक्षा ही विद्यार्थ्यांच्या बौद्धिक गुणवत्ता, संकल्पनात्मक आकलन व तार्किक विचारशक्तीचे मूल्यमापन करणारी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. विशेषतः ग्रामीण व सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा आर्थिक सहाय्याबरोबरच त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला दिशा देणारी ठरते.

मात्र, यावर्षी भाषा व गणित विषयांच्या प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांच्या वयोगट, मानसिक विकास पातळी आणि निर्धारित अभ्यासक्रमाच्या तुलनेत अधिक कठीण असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात पुढे आल्या आहेत. काही प्रश्न अभ्यासक्रमाबाहेरील असल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे परीक्षा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचे न्याय्य मूल्यमापन करण्याऐवजी मानसिक ताण निर्माण करणारी ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

खासदार लंके यांनी शैक्षणिक मानसशास्त्राचा संदर्भ देत लहान वयातील विद्यार्थ्यांसाठी



मूल्यमापन प्रक्रिया प्रेरणादायी व आत्मविश्वास वाढवणारी असावी, असे नमूद केले आहे. प्रश्नपत्रिका संतुलित, अभ्यासक्रमाधारित व आकलनक्षमतेला चालना देणारी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच त्यांनी पुढील बाबींचा विचार करण्याची विनंती केली आहे :

प्रश्नपत्रिका तयार करताना विद्यार्थ्यांचा वयोगट, मानसिकता व शिकण्याची पातळी लक्षात घेणे.

काठिण्य पातळी संतुलित ठेवून न्याय्य मूल्यमापन करणे.

आकलन, विश्लेषण व समस्या सोडवण्यावर आधारित प्रश्नांचा समावेश करणे.

प्रश्नपत्रिका निर्मितीत अनुभवी शिक्षक व शिक्षणतज्ज्ञांचा सहभाग निश्चित करणे.

अभिप्राय संकलन व पुनरावलोकनासाठी पारदर्शक यंत्रणा विकसित करणे.

शिष्यवृत्ती परीक्षा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी, न्याय्य आणि विकासाभिमुख ठरावी, या दृष्टीने परीक्षा परिषदेकडून सकारात्मक व संवेदनशील दखल घेतली जाईल, अशी अपेक्षा खासदार नीलेश लंके यांनी व्यक्त केली आहे.

# प्रवेशासाठी ५ किमीची मर्यादा द्या; महाराष्ट्र विद्यार्थी सेनेचे गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) होणाऱ्या प्रवेश प्रक्रियेत शासनाने लागू केलेला १ किलोमीटरचा नियम जाचक असून, तो बदलून ५ किलोमीटर करण्यात यावा व पोर्टलवरील तांत्रिक त्रुटी दूर कराव्यात, या मागणीसाठी आज महाराष्ट्र विद्यार्थी सेनेच्या वतीने शिर्डी येथील माननीय गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

शासनाच्या नवीन सूत्रानुसार, १ किलोमीटर अंतरावरील शाळा निवडण्याची अट घालण्यात आली आहे. मात्र, यामुळे पालकांना मर्यादित पर्याय उपलब्ध होत असून अनेक विद्यार्थी चांगल्या शिक्षणापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. ही मर्यादा ५ किलोमीटर पर्यंत वाढवावी, जेणेकरून विद्यार्थ्यांना त्यांच्या



परिसरातील अधिक शाळा निवडता येतील, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

तसेच, आरटीईच्या ऑनलाईन पोर्टलवर अनेक नामांकित शाळांची नावे तांत्रिक कारणांमुळे दिसत नाहीत. यामुळे पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. या शाळा तांत्रिक प्रक्रियेत त्वरित समाविष्ट कराव्यात, अशी आग्रही मागणी विद्यार्थी सेनेने केली आहे.

याप्रसंगी महाराष्ट्र विद्यार्थी सेनेचे शिर्डी शहराध्यक्ष प्रशांत रवींद्र वाघचौरे, अभिषेक पोपलघट, गौरव भालेराव, चेतन झिंजाड, रुषी धिवर यांसह संघटनेचे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*मोटार वाहन टॅक्स भ्रष्टाचार प्रकरणी*

# उपलोकायुक्तांकडून कारवाईचा बडगा!

- मोटार वाहन निरीक्षकांसह टंकलेखकांवर वेतन रोखण्याची कारवाई! राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद धुमाळ यांचे पाठपुरावा यशस्वी!

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



प्रादेशिक परिवहन कार्यालय ठाणे अंतर्गत येत असलेल्या नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांनी एकूण ८५० वाहनांच्या प्रकरणात ४.० या संगणक प्रणालीवर जुन्या वाहनांची एन्ट्री घेताना सीबीआर नोंदी अद्यावत न करता टॅक्स क्लिअरन्स अप्रुवल बिले म्हणून शासकीय महसूल हानी झाल्याचे निदर्शनास आल्याने मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला आणि लिपिक टंकलेखक मयूर हटकर व सुहास पवार यांचेवर वेतन रोखण्याची कारवाई करण्यात आली आहे हा प्रकार चौकशीनिहाय अहवालामुळे उघड झाल्याने परिवहन विभागात एकच खळबळ माजली आहे.सविस्तर वृत्त असे की, परिवहन जुन्या वाहनांची बॅकलॉग एन्ट्री, टॅक्स क्लिअरन्स व्हेरिफिकेशन व अप्रुव्हल देऊन शासकीय महसुलाची हानी/ नुकसान केले जाते असे निवेदन राष्ट्रीय मानव हक्क मंचाचे अध्यक्ष शरद काशिनाथ धुमाळ यांनी परिवहन विभागाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या, मात्र त्याकडे दुर्लक्ष केल्याने मा.उपलोकायुक्त कार्यालयाकडे तक्रारी दाखल केल्याने चौकशीचे सत्र फिरून अखेर दोषी मोटार वाहन निरीक्षक शैलेशकुमार कोपुल्ला तसेच लिपिक टंकलेखक मयूर हटकर आणि सुहास पवार यांच्यावर पुढील १ वर्षाकरिता वेतन वाढ रोखण्याची कारवाई/ शिक्षा लादण्यात आली आहे.

# रविंद्रनाथ टागोर शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम व पालक मेळावा संपन्न

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

रविंद्रनाथ टागोर प्राथमिक शाळा कंधार येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते , यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट नृत्याविष्काराने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे उद्‌घाटन केंद्रप्रमुख माधव कांबळे व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पुजनाने करण्यात आले. या वर्षी सांस्कृतिक कार्यक्रमाची थीम ही महाराष्ट्राची "लोककला" ही होती यामध्ये लावणी, भारुड, वासुदेव, पोवाडा, गोंधळ, तमाशा अशा पारंपरिक लोककलांचा समावेश होता विद्यार्थ्यांनी अतिशय उत्कृष्ट नृत्याविष्काराने या लोककला सादर करुन उपस्थितांची मने जिंकली.

# ऑनलाइन गेमिंगच्या विळख्यातून युवा पिढी वाचवा

*आमदार निरंजन डावखरे : गेमिंग कंपन्यांवर 'आत्महत्येला प्रवृत्त' केल्याचा गुन्हा दाखल करण्याची मागणी*

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ऑनलाइन गेमिंगचे व्यसन हे सध्याच्या पिढीसाठी विनाशाचे कारण ठरत असून, या जीवघेण्या खेळामुळे अनेक कोवळ्या जीवांनी आत्महत्या केल्याच्या घटना समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर, कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी आज विधानपरिषदेत हा गंभीर प्रश्न उपस्थित करून सरकारचे लक्ष वेधले. केवळ अशा गेम्सवर बंदी घालून चालणार नाही, तर या गेम्सद्वारे तरुणांना मृत्यूच्या दारात ढकलणाऱ्या कंपन्यांच्या मालकांवर भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०८ (आत्महत्येला प्रवृत्त करणे) अंतर्गत गुन्हे दाखल करण्याची आक्रमक मागणी त्यांनी सभागृहात केली.



आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी सभागृहात पुणे, मुंबई, संभाजीनगर आणि अगदी अलीकडील गाझियाबादमधील घटनांचा उल्लेख केला. "पुण्यात अवघ्या १५ वर्षांच्या मुलाने आत्महत्या केली आणि चिठ्ठीत फक्त 'लॉग आऊट' (Log Out) असे लिहिले. मुंबईत १४ वर्षांच्या मुलीने आई-वडिलांनी गेम खेळू दिला नाही म्हणून टोकाचे पाऊल उचलले, तर संभाजीनगरमध्ये एका युवकाने साडेतीन लाख रुपये हरल्यामुळे स्वतःला संपवले. अलीकडेच गाझियाबादमध्ये तीन बहिणींनी गेममधील 'टास्क' पूर्ण करण्यासाठी एकत्रित उडी मारून जीवन संपवले," असे हृदयद्रावक दाखले देत आमदार अ‍ॅड. निरंजन डावखरे यांनी या प्रश्नाची दाहकता मांडली.

हे गेमिंग अ‍ॅप्स बनवणारे लोक विकृत आहेत. ते एका नावाने गेम बॅन झाला की दुसऱ्या नावाने तोच गेम पुन्हा आणतात. 'ब्लू व्हेल' गेला की 'ब्लॅक व्हेल' येतो. ही साखळी तोडण्यासाठी केवळ प्रतिबंधात्मक उपाय पुरेसे नाहीत. या कंपन्यांच्या मालकांवर थेट कठोर फौजदारी कलमांखाली कारवाई व्हायला हवी. तरुणांच्या आयुष्याची सुवर्ण सकाळ फुलण्याऐवजी त्यांना मृत्यूच्या काळोखात ढकलण्याचे काम हे प्लॅटफॉर्म करत आहेत.

आमदार डावखरे यांच्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना माहिती तंत्रज्ञान मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी या विषयाचे गांभीर्य मान्य केले. सरकारने २ फेब्रुवारी २०२६ रोजी एक उच्चस्तरीय 'टास्क फोर्स' स्थापन केला असल्याची माहिती त्यांनी दिली. यामध्ये मानसोपचार तज्ज्ञ, आयटी एक्सपर्ट्स आणि पोलीस यंत्रणेचा समावेश असून, ऑनलाइन गेमिंगचा शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, डिजिटल जाहिरातींचा प्रभाव आणि आंतरराष्ट्रीय नियम यावर सखोल अभ्यास केला जात आहे.

# डॉ. रमेश अशोक गायकवाड यांना पुरस्कार




**आळेफाटा : (समर्थ गांवकरी)**

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील क्रीडा संचालक डॉ. रमेश अशोक गायकवाड यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७७ व्या विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त उत्कृष्ठ क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक (शहर विभाग) हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

डॉ. रमेश अशोक गायकवाड हे भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, वाघोली, पुणे येथे सन १९९६ पासून शारीरिक शिक्षण संचालक म्हणून गत ३० वर्षापासून अविरत सेवेत आहेत. ते सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अधिसभा व विद्यापरीषदेचे सदस्य आहेत. त्यांनी आतापर्यंत ५ वेळा पुणे जिल्हा क्रीडा विभागाचे यजमानपद भूषविलेले आहे. आजपर्यंत अनेक खेळाडू त्यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविलेले आहेत.

सदर पुरस्कार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, उपकुलगुरु डॉ. पराग काळकर व कुलसचिव यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरुप प्रमाणपत्र, गौरवचिन्हे व मेडल असे होते. पुरस्कार वितरण समारंभास व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. धोंडीराम पवार, बागेश्री मंठाळकर, रविंद्र शिंगणापूरकर, प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, सागर वैद्या, डॉ. विजय खरे, डॉ. प्रभाकर देसाई, कुलसचिव चारुशीला गायके, क्रीडा संचालक डॉ. सुदाम शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

डॉ. रमेश गायकवाड यांचे कायम मार्गदर्शन व सहकार्य लाभत असल्याने मा . बाळासाहेब जाधव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रविण जाधव, शारीरिक संचालक डॉ. कॅप्टन रावसाहेब गरड यांनी या यशाबद्दल अभिनंदन केले तसेच ज्ञानेश्वर ग्रामोन्नती मंडळाचे अध्यक्ष अजयनाना कुऱ्हाडे ,बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुनशेठ पाडेकर, खजिनदार अरुणशेठ हुलवळे तसेच संचालक किशोरशेठ कु-हाडे,भाउशेठ कु-हाडे, बबन सहाणे , उल्हासशेठ सहाणे, बाबुशेठ कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ , जीवनशेठ शिंदे, दिनेश सहाणे, कैलासशेठ शेळके , प्रदिपशेठ गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे व सर्व संचालक मंडळ , सर्व प्राध्यापक, आणि शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व विद्यार्थी, पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# 'स्वारातीम' विद्यापीठात गुणवंत खेळाडू व समिती सदस्यांचा सन्मान

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात दिनांक २४ फेब्रुवारी रोजी अधिसभा सभागृह मध्ये राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या गुणवंत खेळाडूंचा भव्य गौरव सोहळा पार पडला. साउथ-वेस्ट विभागीय, पश्चिम विभागीय तसेच ऑल इंडिया आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून विविध पारितोषिके मिळवून देणाऱ्या खेळाडूंना, प्रशिक्षकांना व संघ व्यवस्थापकांना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

कोतूळ माजी खासदार रामशेठ ठाकूर परिवाराकडून

# कोतुळेश्वर विद्यालयास २५ लाखांची देणगी!

**कोतूळ : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या कोतुळेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,कोतुळ (ता. अकोले जि. अहिल्यानगर) शाखेस शाळा इमारत बांधकामासाठी मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या पत्नी सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर यांनी २५ लाख रुपयांची भरीव देणगी दिली याबद्दल त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. लोकनेते मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब व पत्नी सौ शकुंतला रामशेठ ठाकूर यांना विद्यालयामार्फत सन्मानपत्र प्रदान करण्यात आले तसेच राष्ट्रीय हरित सेना उपक्रमांतर्गत विद्यालयामार्फत बेल व तुळशीचे रोपे त्यांना भेट देण्यात आले. मा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी विद्यालयाच्या विविध उपक्रमांचे कौतुक करून विद्यालयाच्या प्रगतीची माहिती घेतली.यावेळी



छाया (संजय फुलसुंदर)

विद्यालयाचे प्राचार्य श्री. देशमुख बी. के, पर्यवेक्षक श्री. गोडे जे. बी,उपक्रमशील कलाशिक्षक श्री. उकिरडे एस. बी, श्री. गोरडे एस. पी, श्री. लांडे एस. बी, श्री. लांघी एस. व्ही उपस्थित होते. संस्थेचे पदाधिकारी, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, सल्लगार समिती, माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकाऱ्यांनी मा.रामशेठ ठाकूर साहेब यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# बजरंग तालीम आखाडा आळे येथे बेल वृक्षाचे वाटप!



**जुन्नर : (समर्थ गांवकरी)**

तालुका जुन्नर, जिल्हा पुणे येथील बजरंग तालीम आखाडा आळे चे संस्थापक मा. श्री संजयराव किसनराव भुजबळ पाटील यांना हरित सेनेचे सदस्य श्री संजय उकीर्डे सर यांच्या हस्ते बेल वृक्षाचे वाटप करण्यात आले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपस्थितांनी अधिकाधिक वृक्ष लागवड करून पर्यावरण संतुलन राखण्याचे आवाहन केले. या प्रसंगी हरित उपक्रमाचे कौतुक करत संजयराव भुजबळ पाटील यांनी पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे मत व्यक्त केले. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

# ई-पीक पाहणीतील सहाय्यक स्तरावरील कामकाजाला टाळाटाळ ?

## १० मार्च २०२६ अंतिम मुदत; शासनाच्या पत्रानंतरही काही ठिकाणी टाळाटाळ

**किनवट : (समर्थ गांवकरी)**

रब्बी हंगाम 2025-26 साठी ई-पीक पाहणी (Digital Crop Survey – DCS) मोबाईल अँपद्वारे पीक नोंदणी प्रक्रिया राज्यभर सुरू असताना सहाय्यक (तलाठी) स्तरावरील कामकाजात काही ठिकाणी विलंब होत असल्याची बाब पुढे येत आहे. सहाय्यक स्तरावरील पीक पडताळणी व नोंद दुरुस्तीची अंतिम मुदत १० मार्च २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली असली, तरी काही तालुक्यांत अद्याप अपेक्षित गतीने काम होत नसल्याची चर्चा आहे.

महाराष्ट्र शासनच्या महसूल व वन विभागांतर्गत भूमि अभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार रब्बी हंगामासाठी ई-पीक पाहणी प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यानुसार शेतकरी स्तरावरील नोंदणी २४ जानेवारी २०२६ रोजी पूर्ण झाली असून, सहाय्यक स्तरावरील कालावधी २५ जानेवारी २०२६ ते १० मार्च २०२६ असा निश्चित आहे.




जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या पत्रात १०० टक्के पीक पाहणी पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. आवश्यक त्या ठिकाणी मंडळ अधिकाऱ्यांनी मोबाईल अँप लॉगिनद्वारे दुरुस्त्या करून निश्चित कालावधीत काम पूर्ण करणे बंधनकारक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्यांनी MIS प्रणालीद्वारे नियमित आढावा घेऊन प्रलंबित तालुक्यांमध्ये विशेष मोहीम राबवावी, असेही निर्देश आहेत.

मात्र प्रत्यक्ष परिस्थितीत काही भागांत सहाय्यकांकडून पीक पडताळणी व नोंदींच्या दुरुस्तीमध्ये टाळाटाळ होत असल्याची तक्रार शेतकरी व्यक्त करत आहेत. काही गावांमध्ये शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी करूनही सहाय्यक स्तरावर पडताळणी प्रलंबित असल्याने नोंदी अद्याप अंतिम झालेल्या नाहीत.

यामुळे पीक विमा, अनुदान, तसेच आपत्ती मदतीसाठी आवश्यक असलेली अचूक माहिती अद्याप प्रणालीमध्ये प्रतिबिंबित झालेली नसल्याची भीती व्यक्त होत आहे. शासनाच्या स्पष्ट आदेशांनंतरही अपेक्षित गतीने काम न झाल्यास अंतिम मुदतीपर्यंत १०० टक्के पूर्णता साध्य होईल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सहाय्यक स्तरावरील कालावधी संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना जिल्हा प्रशासनाने तातडीने आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. अंतिम मुदत १० मार्च २०२६ ही लक्षात घेता संबंधित अधिकाऱ्यांनी जबाबदारीने व तत्परतेने काम पूर्ण करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे. राज्यातील पीकस्थितीचा अचूक डेटा संकलित होण्यासाठी सहाय्यक स्तरावरील कामकाज वेळेत पूर्ण होणे अत्यावश्यक आहे. शासनाच्या सूचनांनुसार सर्व तालुक्यांनी मोहीम स्वरूपात काम पूर्ण करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया सुरू

## सहकार आयुक्तांचा आदेश : मतदार यादीसाठी पत्र



**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. मतदारांची प्रारूप यादी तयार करून ती प्रसिद्ध केली जाणार आहे. जिल्हा उपनिबंधकांकडून ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तसे पत्र बँकेला गुरुवारी देण्यात येणार आहे. त्यामुळे गावोगावच्या विविध कार्यकारी सोसायट्यांना आता मतदानासाठी ठराव करावे लागणार असल्याने जिल्ह्यातील राजकारण पुन्हा एकदा ढवळून निघणार आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे सहकारी संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली होती. ही स्थागिती उठविण्यात आली आहे. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे सचिव अशोक गाडे यांनी मंगळवारी सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्याचा आदेश काढला आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विद्यमान संचालकांची मुदत शुक्रवारी (दि. २०) संपुष्टात आली आहे. सहकार आयुक्तांच्या आदेशानुसार बँकेच्या निवडणुकीची प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून हाती घेण्यात आली आहे. निवडणुकीसाठीची मतदार यादी तयार करण्याचे सर्वप्रथम हाती घेतले जाणार आहे. त्यासाठी विविध कार्यकारी सोसायटींना मतदाराच्या नावे ठराव करावे लागतील. मतदाराच्या नावासह ठराव बँकेला माजा आमदार तथा जिल्हा बकच अध्यक्ष चंद्रशेखर घुले पाटील यांच्या अधिपत्याखालील लोकनेते मारुतराव घुले पाटील, आमदार मोनिका राजळे यांच्या वृद्धेश्वर सहकारी साखर कारखाना आणि माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मुळा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीची प्रक्रियाही सुरू होणार आहे. चालू वर्षात या तीन कारखान्यांना नवीन कारभारी मिळणार आहेत. त्यामुळे नेत्यांची कसोटी लागणार आहे.

### १५३ सहकारी संस्थांचा वाजला बिगुल

जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका रखडलेल्या होत्या. संस्थांच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याचे आदेश सहकार विभागाकडून देण्यात आले आहेत. त्यानुसार १५३ सहकारी संस्थांच्या निवडणुकीची प्रक्रिया सुरू होणार आहे. बदलत्या राजकीय समीकरणामुळे सोसायट्या ताब्यात ठेवण्यासाठी गाव पुढाऱ्यांचाही चांगलाच कस लागणार आहे. पाठवावे लागणार आहेत. त्यानंतर मतदारांची प्रारूप मतदार यादी तयार होईल. ही मतदार यादी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून प्रसिद्ध केली जाईल. त्यावर हरकती घेण्यासाठी मुदत दिली जाणार असून, त्यानंतर निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाणार असल्याचे विश्वासनीय सूत्रांकडून सांगण्यात आले.

# एअरटेल एक उच्च-दर्जाचे एनबीएफसी व्यासपीठ निर्माण करण्यासाठी मोठे प्रमाणात प्रयत्न करत आहे

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आज त्यांच्या गैर-बँकिंग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) एअरटेल मनी लिमिटेडसाठी प्रमुख योजना जाहीर केल्या, ज्या भारतातील क्रेडिट गॅप कमी करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत. एनबीएफसी उपकंपनी पुढील काही वर्षांत ₹20,000 कोटी भांडवलीकरणासह विकसित होईल. एअरटेल, भारती एंटरप्रायझेस लिमिटेड द्वारे, प्रमोटर गटासह 70% योगदान देईल आणि उर्वरित 30% आणेल. मजबूत डिजिटल मालमत्ता, 500+ डेटा शास्त्रज्ञांचे पाठबळ असलेले मोठे डेटा आणि विश्लेषण इंजिन आणि सखोल ऑपरेशनल कौशल्यासह, एअरटेलचे उद्दिष्ट संपूर्ण भारतात सुलभ, सुरक्षित आणि नाविन्यपूर्ण डिजिटल वित्तीय सेवांमध्ये जलद प्रवेश वाढवणे आहे. एअरटेलने गेल्या दोन वर्षांत त्याच्या डिजिटल व्यासपीठाचा आणि खोलवर एकात्मिक चॅनेलचा वापर करून, उच्च-कार्यक्षमता असलेले क्रेडिट इंजिन तयार केले आहे, परिणामी भारतातील सर्वात मजबूत कर्ज सेवा प्रदात्या (एलएसपी) मॉडेलपैकी एक बनले आहे. या व्यासपीठाला आधीच ₹9,000 कोटींहून अधिक रकमेचे वितरण करून उच्च स्वीकार्यता मिळाली आहे - ज्याला सर्वोत्तम श्रेणीतील दोषपूर्ण परिणाम, मजबूत अंडररायटिंग मॉडेल्स, शिस्तबद्ध पोर्टफोलिओ व्यवस्थापन आणि वास्तविक वेळ जोखीम देखरेखीद्वारे समर्थित केले आहे. "गेल्या दोन वर्षात आमच्या एलएसपी व्यासपीठाचे यश हे सिद्ध करते की आम्ही तंत्रज्ञान, डेटा आणि ग्राहकांचा विश्वास एकत्रित करून देशव्यापी प्रभाव पाडू शकतो. भारती एअरटेलचे कार्यकारी उपाध्यक्ष गोपाल विठ्ठल म्हणाले, "आम्ही भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि मोठ्या प्रमाणात डिजिटल क्रेडिट इंजिनपैकी एक तयार केले आहे - उद्योगाच्या सर्वोत्तम कामगिरीच्या मापदंडांच्या आधारे लाखो लोकांना उच्च-गुणवत्तेचे क्रेडिट प्रदान करत आहोत." आमचा एनबीएफसी विस्तार हा पाया मजबूत करतो आणि एक वेगळा, भविष्यासाठी तयार डिजिटल कर्ज व्यवसाय उभारण्याचे आमचे उद्दिष्ट प्रदर्शित करतो - जो विश्वास, नावीन्य आणि आर्थिक समावेशनाचे प्रतीक आहे."

# आयडीएफसी फर्स्ट बँकेने सरकारी देयकातून कर्तव्याप्रति राखला विश्वास

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

आयडीएफसी फर्स्ट बँकेने चंदीगडमधील आपल्या एका शाखेत घडलेल्या घटनेच्या खुलाशा संदर्भात आपली तत्वनिष्ठ भूमिका आणखी स्पष्ट केली आहे. सदर घटना हरियाणा सरकारच्या काही विभागांच्या खात्यांशी संबंधित असून त्याबाबत बँकेने अलीकडेच माहिती जाहीर केली होती. प्राथमिक निष्कर्षांनुसार असे दिसून आले आहे की, शाखेतील काही कर्मचाऱ्यांनी बनावट दस्तऐवज आणि पेमेंट सूचना मंजूर करून फसवणूक केली आहे. या प्रकारामध्ये बाह्य व्यक्तींशी संगनमत असण्याची शक्यता आहे आणि संबंधित विभागांकडून सध्या या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. सध्या या प्रकरणाचा तपास सुरू असतानाही बँकेने हरियाणा सरकारच्या संबंधित विभागांनी दावा केलेली १०० टक्के मुद्दल आणि व्याजाची रक्कम त्वरित अदा केली आहे. ही एकूण रक्कम ५८३ कोटी रुपये आहे. अदा करण्यात येणाऱ्या अंतिम रकमेत भविष्यातील कोणताही दावा किंवा ताळमेळ यानुसार फेरबदल होऊ शकतो. सदर प्रकरणाचे निराकरण करताना बँकेने अवलंबलेला तत्त्वनिष्ठ दृष्टिकोन, त्वरित केलेली कारवाई आणि व्यावसायिक वर्तणुकीबद्दल हरियाणा सरकारच्या संबंधित विभागांनी बँकेचे आभार मानताना कौतुक केले आहे. हरियाणा सरकार आणि पोलीस तसेच तपास यंत्रणेच्या पूर्ण सहकार्याच्या आधारे आयडीएफसी फर्स्ट बँक या फसवणुकीतील गुन्हेगारांविरुद्ध लढण्यासाठी आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन शिक्षा देण्यासाठी कटिबद्ध आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक आर्थिकदृष्ट्या अतिशय भक्कम असून भांडवलाची पातळी अतिशय योग्य आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत, 'क्रिसिल'ने बँकेच्या मुदत ठेवींसाठी 'एएए' दर्जा दिलेला आहे, तसेच क्रिसिल, इक्रा, इंडिया रेटिंग्स आणि केअरकडून दीर्घकालीन श्रेणीसाठी 'एए+' दर्जा मिळालेला आहे. बँकेचा एकूण ग्राहक व्यवसाय (कर्ज आणि ठेवी) ५,६२,०९० कोटी रुपये आहे आणि तो मागील वर्षाच्या तुलनेत २२.६ टक्क्यांनी वाढला आहे.

# 'मास्टरक्लास' चे पुण्यात आयोजन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

'केरळ टुरिझम' तर्फे 'लेन्सकेप केरळ' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनात दहा नामवंत छायाचित्रकारांनी संपूर्ण केरळमध्ये टिपलेल्या १०० निवडक छायाचित्रांचा संग्रह सादर केला जाणार आहे. केरळमधील लोकांचे वैविध्यपूर्ण जीवन, संस्कृती, निसर्गसौंदर्य, वन्यजीव आणि दैनंदिन जीवनातील क्षण अशा विविध विषयांना या प्रदर्शनात स्थान देण्यात आले आहे. दहा वेगवेगळ्या दृष्टिकोनातून साकारलेले हे प्रदर्शन 'गॉड्स ओन कंट्री' म्हणजेच केरळचे एक चैतन्यमय आणि आधुनिक रूप प्रेक्षकांसमोर उभे करते. हे प्रदर्शन १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान सकाळी ११:०० ते रात्री ८:०० वाजेपर्यंत राजा रवि वर्मा गॅलरी, आर्ट टुडे स्टुडिओ, घोले रोड, शिवाजीनगर येथे असणार आहे.

# अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथे इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजीमध्ये ५०० यशस्वी शस्त्रक्रियांचा टप्पा पूर्ण

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**



अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल, नाशिक येथील इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी विभागाने ५०० यशस्वी इंटरव्हेन्शनल प्रक्रियांचा (IR Procedures) महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केला आहे. या उल्लेखनीय कामगिरीचे श्रेय हॉस्पिटलचे इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजिस्ट डॉ. अमोल भालेकर यांच्या कौशल्यपूर्ण कार्याला जाते. या निमित्ताने हॉस्पिटलतर्फे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी ही आधुनिक वैद्यकशास्त्रातील अत्याधुनिक शाखा असून, मोठी शस्त्रक्रिया न करता सूक्ष्म उपकरणांच्या सहाय्याने आणि इमेजिंग मार्गदर्शनाखाली (CT, Ultrasound, Angiography) उपचार केले जातात. त्यामुळे रुग्णांना कमी वेदना, कमी रक्तस्राव, कमी धोका आणि जलद पुनर्वसन याचा मोठा फायदा होतो.

या ५०० प्रक्रियांमध्ये अँजिओग्राफी व अँजिओप्लास्टी, रक्तवाहिन्यांमधील ब्लॉकेजवरील उपचार, ट्यूमर एम्बोलायझेशन, व्हेरिकोस वेन्स उपचार, बायोप्सी, ड्रेनेज प्रक्रिया, डायलिसिस कॅथेटर बसविणे, तसेच विविध अवयवांशी संबंधित गुंतागुंतीच्या मिनिमली इन्वेसिव्ह प्रक्रियांचा समावेश आहे. अत्याधुनिक उपकरणे, अचूक इमेजिंग तंत्रज्ञान आणि प्रशिक्षित तज्ज्ञ टीम यांच्या समन्वयातून या प्रक्रिया सुरक्षितरीत्या पार पाडण्यात आल्या.

या कार्यक्रमात बोलताना डॉ. अमोल भालेकर म्हणाले, "५०० इंटरव्हेन्शनल प्रक्रियांचा टप्पा हा माझ्यासाठी आणि संपूर्ण टीमसाठी अत्यंत समाधानाचा क्षण आहे. इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजीमुळे अनेक गंभीर आजारांवर मोठी शस्त्रक्रिया न करता प्रभावी उपचार करता येतात. रुग्णांना कमी त्रास देऊन सर्वोत्तम परिणाम मिळवणे हेच आमचे ध्येय आहे."

याप्रसंगी बोलताना हॉस्पिटलचे केंद्र प्रमुख श्री. अनुप त्रिपाठी यांनी सांगितले की, "अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि तज्ज्ञ डॉक्टरांच्या सहाय्याने रुग्णांना जागतिक दर्जाची सेवा देण्याचा आमचा प्रयत्न असतो. डॉ. अमोल भालेकर यांनी इंटरव्हेन्शनल रेडिओलॉजी क्षेत्रात केलेली ही कामगिरी नाशिक व उत्तर महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाची आहे." या यशामुळे अशोका मेडिकव्हर हॉस्पिटलने मिनिमली इन्वेसिव्ह उपचार पद्धतींच्या क्षेत्रात आपली भक्कम ओळख निर्माण केली असून, भविष्यातही अत्याधुनिक, सुरक्षित आणि रुग्ण-केंद्रित सेवा देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# भ्रष्टाचाराविरोधात पंचायत समिती अकोले येथे ठिय्या आंदोलन!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**




ग्रामपंचायत कोंभाळणे येथील सरपंच व तत्कालीन ग्रामसेवक मॅडम यांच्या मनमानी कारभाराविरोधात आज पंचायत समिती अकोले येथे गावातील तरुण व ग्रामस्थांनी ठिय्या आंदोलन केले. अनेक दिवसांपासून विविध कामांमध्ये भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत वारंवार तक्रारी करूनही दखल घेतली जात नसल्याने अखेर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायत कोंभाळणे येथील निधीचा मोठ्या प्रमाणात गैरवापर झाल्याचे दिसून येत आहे. अनेक विकासकामांचे ठराव ग्रामसभा व मासिक सभेत न घेता बोगस पद्धतीने नोंदविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. आपल्या सोयीनुसार ठराव लिहिणे, कामे कोणालाही विचारात न घेता परस्पर मंजूर करणे आणि पदाचा गैरवापर करून स्वार्थी कामे रेटून नेणे, असे प्रकार झाल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे.

गावातील काही वाडी-वस्त्यांवर वर्षानुवर्षे पाण्याची टंचाई असतानाही त्या ठिकाणी दुर्लक्ष करण्यात आले. उलट ज्या ठिकाणी आधीच पाण्याची सोय उपलब्ध होती, त्या ठिकाणी स्वार्थासाठी पेसा निधीचा वापर करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणाची चर्चा केल्यानंतर काही लाभार्थी व संबंधितांकडून दमदाटी करून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न झाल्याचाही आरोप करण्यात आला.

या आंदोलनास तालुक्याचे युवा नेते सतीश दादा भांगरे, बीएसएफ फोडसे बारी गावचे उपसरपंच गणेश खाडे तसेच अँड. साबळे साहेब यांनी पाठिंबा दर्शविला. दरम्यान, जिल्हा परिषद अहिल्यानगरचे उपकार्यकारी अधिकारी यांनी आंदोलनाची दखल घेत पंचायत समितीच्या कर्मचाऱ्यांना जाब विचारला. पुढील आठ दिवसांत संबंधित सर्व कामांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले.


यानंतर पंचायत समिती अकोलेचे गट विकास अधिकारी श्री. माने यांनी लेखी आश्वासन देत आठ दिवसांत चौकशी सुरू करण्याचे कळविले. त्यानंतर आंदोलनकर्ते सिकंदर पोपेरे, गौतम साबळे सर, नामदेव भिवा पोपेरे, धोंडिबा गोडे, मंगळा करवंदे, रवींद्र पोपेरे, विजय दराडे व इतर ग्रामस्थांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले. सदर प्रकरणातील सर्व कामांचे वरिष्ठ स्तरावरून लेखापरीक्षण करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. ग्रामस्थांचे लक्ष आता या चौकशी अहवालाकडे लागले असून दोषींवर कारवाई होण्याची मागणी जोर धरत आहे.

# प्रमुख योगदान देण्याची क्षमता

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

भारतीय कॉर्पोरेट अन्न सेवा ज्यामध्ये संस्थात्मक खानपान, कॉर्पोरेट कॅफेटेरिया, व्यवस्थापित अन्न सेवा तसेच कामाच्या ठिकाणी संघटित अन्न वितरण यांचा समावेश आहे, हे भारतातील एकूण अन्न सेवा बाजारपेठेतील सर्वात गतिमान क्षेत्रांपैकी एक आहे. नवीनतम उद्योग अंदाजानुसार, भारतातील अन्न सेवांमध्ये २०२४ ते २०२८ दरम्यान अंदाजे ८.१% च्या चक्रवाढ वार्षिक वाढीच्या दराने (CAGR) वाढ होण्याची क्षमता आहे आणि कंपन्यांनी त्यांच्या सेवांचे व्यावसायिकीकरण केल्याने उद्योगाचा संघटित विभाग १३% पेक्षा जास्त दराने वाढण्याची शक्यता आहे. २०२८ पर्यंत, ग्राहकांच्या मागणीला मजबूत बळकटी देऊन आणि खाण्याच्या सवयींमध्ये संरचनात्मक बदलांमुळे बाजारपेठ जवळजवळ ७.८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

# iQOO 15R लाँच



**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

24 फेब्रुवारी 2026: उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड iQOO ने आज iQOO 15R लाँच केला. हा स्मार्टफोन फ्लॅगशिप-लेव्हल पॉवर आणि परफेक्ट-फिट डिझाइन एकत्र करतो जो दैनंदिन वापरासाठी संपूर्ण आराम प्रदान करतो. तरुण व्यावसायिकांना लक्षात घेऊन डिझाइन केलेले, iQOO 15R हे अशा लोकांसाठी डिझाइन केले आहे जे काम, गेमिंग आणि मनोरंजनामध्ये सहजतेने स्विच करतात, शक्तिशाली कामगिरी, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी लाइफ आणि एक आश्चर्यकारक दृश्य अनुभव देतात. त्याचा 6.59-इंचाचा डिस्प्ले एका हाताने वापरण्यासाठी देखील अंतर्ज्ञानी आणि आरामदायी आहे. iQOO च्या उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन पोर्टफोलिओला आणखी बळकटी देत, iQOO 15R मध्ये स्नॅपड्रॅगन 8 Gen 5 प्रोसेसर आहे, जो जलद गती, सहज प्रतिसाद आणि दिवसभर सातत्याने उच्च कार्यक्षमता प्रदान करतो.

यात iQOO ची आतापर्यंतची सर्वात मोठी बॅटरी देखील आहे, जी फक्त 7.90 मिमीच्या अल्ट्रा-स्लिम डिझाइनमध्ये ठेवली आहे, ज्यामुळे तो 7600 mAh बॅटरीसह भारतातील सर्वात पातळ स्मार्टफोन बनतो. वापरकर्त्यांचा अनुभव वाढवणे म्हणजे iQOO ची मालकीची Q2 सुपरकॉम्प्युटिंग चिप आहे, जी या विभागातील सर्वात स्थिर 144 FPS गेमिंग अनुभव प्रदान करते. या फोनमध्ये दीर्घकालीन कामगिरीसाठी ६.५K IceCore VC कूलिंग चेंबर आहे आणि तो अँड्रॉइड १६ वर आधारित OriginOS ६.० चालवतो, ज्यामध्ये ४ वर्षांचे सॉफ्टवेअर आणि ६ वर्षांचे सुरक्षा अपडेट्स आहेत. शिवाय, यात Sony LYT-७००V OIS कॅमेरा, १.५K १४४Hz AMOLED आय-केअर डिस्प्ले आणि IP६८ आणि IP६९ धूळ आणि पाण्याचे प्रतिरोधक वैशिष्ट्य आहे, ज्यामुळे तो प्रवासात असलेल्या व्यावसायिकांसाठी एक विश्वासार्ह दैनंदिन स्मार्टफोन बनतो.

iQOO १५R ची किंमत ८GB + २५६GB व्हेरिएंटसाठी ४४,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत: ₹४०,९९९), १२GB + २५६GB व्हेरिएंटसाठी ४७,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत: ₹४३,९९९) आणि १२GB + ५१२GB व्हेरिएंटसाठी ५२,९९९ (निव्वळ प्रभावी किंमत: ₹४८,९९९) आहे.

# झेनडेस्कने पुण्यात उभारले इनोव्हेशन हब

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



झेनडेस्कने आज पुण्यात संशोधन आणि विकासासाठी (आर अँड डी) 'इनोव्हेशन हब' च्या उद्घाटनाची घोषणा केली. ही घोषणा कंपनीच्या भारतातील विस्ताराच्या तसेच जागतिक उत्पादन विकास टीमच्या वाढीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. प्रतिभेचे नवीन स्रोत वाढवणे आणि जागतिक टीम्समधील समन्वय बळकट करणे, या झेनडेस्कच्या धोरणाचा एक भाग म्हणून झेनडेस्क पुणे इनोव्हेशन हब ('पुणे हब' किंवा 'हब') स्थापन करण्यात आले आहे. पुणे आता कंपनीच्या जागतिक विकास केंद्रांपैकी एक बनले असून, जगभरातील कामकाजाचा भाग म्हणून या टीमचा आकार आणि महत्त्व अधिक वाढणार आहे. झेनडेस्कच्या रिझोल्यूशन प्लॅटफॉर्मवर केंद्रित असलेल्या एआय-सक्षम (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) सोल्यूशन्समध्ये कंपनीचे नेतृत्व अधिक भक्कम करण्यात झेनडेस्कचे पुणे हब महत्त्वाची भूमिका बजावेल. पुणे हब एक परिपूर्ण इनोव्हेशन केंद्र म्हणून काम करते. यामध्ये प्रॉडक्ट मॅनेजमेंट, युएक्स डिझाईन, इंजिनिअरिंग आणि सर्व्हिस रिलायबिलिटी इंजिनिअर्स यांसारख्या विविध विभागांचा समावेश आहे.

हे विभाग या हबला स्वतंत्र आणि संपूर्ण जबाबदारीसह जागतिक स्तरावरील योजना (रोडमॅप) राबवण्यासाठी सक्षम करतात. ही टीम कोअर क्लाउड इन्फ्रास्ट्रक्चर आणि प्लॅटफॉर्म सर्व्हिसेसपासून ते अद्ययावत ॲप्लिकेशन लेयरपर्यंतच्या संपूर्ण टेक्नॉलॉजी स्टॅकमधील महत्त्वपूर्ण विभागांची जबाबदारी सांभाळते.

# एचडीएफसी बँकने गुवाहाटीत नवे टेक आणि डिजिटल फॅक्टरीचे केले उद्घाटन

**गुवाहाटी : (समर्थ गांवकरी)**



भारतातील खासगी क्षेत्रातील अग्रगण्य बँक एचडीएफसी बँकेने गुवाहाटीत आपले नवे टेक आणि डिजिटल फॅक्टरी सुरू केले आहे. हे केंद्र प्रगत तंत्रज्ञान विकास, नवोन्मेष आणि प्रतिभा संवर्धनासाठी कार्य करणार असून, आसाममध्ये AI, डिजिटल आणि सायबरसिक्युरिटी क्षेत्रातील कौशल्यवृद्धीला चालना देणार आहे. ही सुविधा आसाममधील पहिली तर राष्ट्रीय स्तरावर चौथी आहे. यापूर्वी बँकेच्या अशा सुविधा मुंबई, बेंगळुरू आणि गुरुग्राम येथे आहेत. इमारतीचे उद्घाटन आसामचे मुख्यमंत्री आदरणीय डॉ. हिमंत बिस्वा सरमा यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी एचडीएफसी बँकेचे डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. कैझाद भरुचा, एचडीएफसी बँकेचे मुख्य माहिती अधिकारी श्री. रमेश लक्ष्मीनारायण, आसाम सरकारचे मान्यवर, सहभागी शैक्षणिक संस्थांचे सदस्य आणि एचडीएफसी बँकेचे अधिकारी उपस्थित होते. ही सुविधा राज्यातील कुशल व्यावसायिकांना करिअरच्या संधी उपलब्ध करून देईल, ज्यामुळे ते थेट पुढील पिढीच्या तंत्रज्ञान विकासात योगदान देऊ शकतील. स्थानिक तंत्रज्ञान प्रतिभेचा उपयोग करून बँक टेक आणि डिजिटल फॅक्टरीसाठी क्षमता अधिक मजबूत करणार आहे. उद्दिष्ट म्हणजे AI, क्लाउड, डेटा आणि कोर इंजिनिअरिंग या क्षेत्रांमध्ये तंत्रज्ञानाची प्रगती साधणे, ज्यामुळे राज्यात डिजिटल उत्पादन निर्मितीची क्षमता खुली होईल. एचडीएफसी बँकेने आसाम सरकारसोबत ॲडव्हान्टेज आसाम 2.0 या उपक्रमांतर्गत भागीदारी केली आहे, ज्याचे नेतृत्व आसामचे आदरणीय मुख्यमंत्री करत आहेत. या संयुक्त उपक्रमांतर्गत, एचडीएफसी बँक आणि आसाम सरकार BFSI आणि फिनटेक क्षेत्राशी संबंधित संरचित कौशल्य-विकास अभ्यासक्रमाद्वारे शैक्षणिक ज्ञान आणि उद्योगातील तज्ज्ञता यांचा संगम साधण्याचा मानस बाळगतात. हा कार्यक्रम कॅम्पस-टू-कॉर्पोरेट क्षमता या संकल्पनेवर आधारित असून, बँकिंग आणि फिनटेक उद्योगातील नोकरीच्या गरजांशी सुसंगत आहे. अभ्यासक्रमात पारंपरिक बँकिंग ज्ञानासोबतच नव्या IT क्षेत्रांचा समावेश आहे. हा कार्यक्रम सप्टेंबर 2025 मध्ये सुरू झाला असून सध्या 150 हून अधिक विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना एचडीएफसी बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उद्योगसंबंधित ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव मिळणार आहे.

या कार्यक्रमाचा भाग असलेल्या विद्यार्थ्यांना एचडीएफसी बँकेत 2 – 4 महिन्यांच्या कालावधीसाठी इंटर्नशिपची संधी मिळेल. यामुळे त्यांना शैक्षणिक व तंत्रज्ञानाशी संबंधित संकल्पना प्रत्यक्ष कॉर्पोरेट वातावरणात वापरण्याचा अनुभव मिळेल. या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांना कोणताही अतिरिक्त खर्च करावा लागणार नाही. या प्रसंगी श्री. कैझाद भरुचा, डेप्युटी मॅनेजिंग डायरेक्टर, एचडीएफसी बँक म्हणाले, "गुवाहाटीत आमचे नवे टेक आणि डिजिटल फॅक्टरी सुरू करताना आम्हाला नवीन डिजिटल उत्पादने आणि सेवा सुरू करता येतील तसेच IT क्षमता वाढवता येईल. फेब्रुवारी 2025 मध्ये ॲडव्हान्टेज आसाम 2.0 मध्ये आसाम सरकारसोबत MoU साइन केले होते आणि एका वर्षात ही सुविधा उभारणे शक्य झाले. हे आसाम सरकारच्या मजबूत पाठिंब्यामुळे शक्य झाले. या सुविधेमुळे आम्हाला नवीन डिजिटल उत्पादने आणि सेवा सुरू करता येतील तसेच IT क्षमता वाढवता येईल. आसाममधील अभियांत्रिकी प्रतिभेला आकर्षित करून त्यांना बँकिंग क्षेत्रातील पुढील पिढीतील तंत्रज्ञान विकासात योगदान देता येईल आणि ते आपल्या गावाजवळ राहून काम करू शकतील." एचडीएफसी बँकेचे टेक आणि डिजिटल फॅक्टरी मॉडेल डिजिटल अंमलबजावणीचे केंद्रबिंदू असून, एक्स्पिरियन्स डिझाईन, मोबाईल आणि क्लाउड इंजिनिअरिंग, APIs आणि ऑर्केस्ट्रेशन, डेटा आणि GenAI तसेच सिक्युअर-बाय-डिझाईन आर्किटेक्चर यांसारख्या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करते. आसाम हे बँकेसाठी महत्त्वाचे राज्य राहिले आहे.

# जनसंवाद ग्रामीण साहित्य संमेलन उत्साहात संपन्न

■ मान्यवरांच्या पुरस्काराबरोबर जनसंवाद व संविधान जागृतीचा संदेश



**नायगाव: (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील मुकनायक वाचनालय मांजरम व सप्तरंगी साहित्य मंडळ, नांदेड जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन दि. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी कै. माधवराव शिंदे गुरुजी साहित्य नगरी, मांजरम येथे स्वर्गीय दिगंबर भाई शिंदे विचारमंच येथे उत्साहात संपन्न झाले. साहित्य, संस्कृती, विचार आणि जनसंवादाची समृद्ध मेजवानी या संमेलनातून साहित्यप्रेमींना अनुभवता आली. संमेलनाचे उद्घाटन उद्योजक बालाजी बचेवार यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. रामकृष्ण बदने होते. विशेष प्रकाशन व पुरस्कार वितरण कार्यक्रमास अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, व रिपाईचे राज्याध्यक्ष मधुकर मांजरमकर,ऍड.विजय गोनारकर, जगणं गोनारकर,डॉ हनुमंत भोपाळे,अनुरत्न वाघमारे,सचिन कांबळे कॉन्ट्रॅक्टर पुणे, हौसाजी वारघडे, शिवाजी कोंकेवाड,यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या संमेलनात मूकनायक वाचनालयाचे संस्थापक डी. के. वाघमारे गुरुजी यांना जीवनगौरव पुरस्कार, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब पांडे यांना राज्यस्तरीय बाळशास्त्री जांभेकर पुरस्कार, भीमराव तरटे,जगनराव गोणारकर, साहेबराव देवदे,प्रा. संजयकुमार मांजरमकर,प्रा. गजानन देवकर बळीराम नव्हारे गुरुजी,शंकर माने वजीरगावकर,शिवाजी शिंदे, शिवाजी मलदोडे,संजय पाटील,श्रीकांत गोणारकर,कपिल डुमणे ,शाहीर विलास शिंदे किशोर वाघमारे बारुळकर,माधुरी पिंगळे या सर्वांना सप्तरंगी साहित्य मंडळ व मूकनायक वाचनालय तर्फे साहित्य, पत्रकारिता, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या वेळी उद्घाटकीय भाषणात बालाजी बचेवार यांनी ग्रामीण भागात साहित्य संमेलनाचे केलेले धाडस म्हणजे कौतुकास्पद घटना असल्याचे नमूद केले तर ऍड विजय गोनारकर यांनी आपल्या सुंदर भाषणात उपस्थितांची मन जिंकली,अप्पर जिल्हाधिकारी यांनी संविधान व वाचन संस्कृतीची आजच्या काळात किती गरज आहे हे सांगत संविधान पारायणाची आवश्यकता व्यक्त केली. प्रास्ताविक व मनोगत रणजीत गोनारकर ,जीवन मांजरमकर,अनुरत्न वाघमारे यांनी केले.प्रारंभी शाहीर विलास शिंदे मांजरमकर यांनी स्वागत गीत गायले ,संचलन कैलास धुतराज यांनी तर आभार प्रदन्याधर ढवळे यांनी मानले... दुपारच्या सत्रात भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात माझी भूमिका या परिसंवादात माजी प्राचार्य माधव गाडेकर लातूर यांच्या अध्यक्षतेखाली प्रा डॉ सुरेश वाघमारे लातूर,व प्रा डॉ हनुमंत भोपळे नांदेड यांनी उत्कृष्ट विचार मांडत सहभाग नोंदवला,त्या नंतर प्रसिद्ध कथाकार पत्रकार राम तरटे यांचे प्रभावी कथा कथन झाले. कै. भाई दिगंबर शिंदे विचारमंचावर दिवसभर काव्यवाचन, परिसंवाद, कथाकथन, गझल संध्या आणि राज्यस्तरीय कवीसंमेलन असे विविध कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमाच आकर्षण ठरले ते प्रारंभी काढलेली ग्रंथदिंडी. ग्राम पंचायत कार्यालय समोरील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला मानवंदना करून सुरुवात झाली.

# बेकायदेशीर क्रेशर, गौण खनिज उत्खलनचा विरोधात आमरण उपोषण

## तळेगाव येथील आर एन मेटलच्या विरुद्ध तक्रारी असून प्रशासन उदासीन




**तामसा : (समर्थ गांवकरी)**

हदगांव तालुक्यातील तळेगाव येथील आर एन मेटल क्रेशर मशीन च्या विरोधात सामाजिक कार्यकर्ते सुशील भालेराव यांच्या उपोषण.

हदगांव तालुक्यातील तळेगाव येथील बेकायदेशीर डांबर प्लेंट, गिट्टी क्रेशर मशीन मुळे तळेगाव वासियांना नाहक त्रास होतं असल्यामुळे नागरिकांना धुळी, स्फोटक कर्कस आवाजाने गरीबलोकांचे घराला तडे पडल्याने ही सर्व तक्रारी शासन दरबारात मांडून सुद्धा काही उपयोजना निघत नाही मनहून तळेगाव निवासी सुशील भालेराव या सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हाधिकारी कार्यालय समोर उपोषणाचा इशारा दिला होता परंतु शासन दरबारी दखल न घेतल्याने 23 फेब्रुवारी पासून आमरण उपोषण वर बसल्याने आज उपोषणाला तिसरा दिवस असून शासनाच्या या उपोषणास काहीच फरक पडत नाही का ?एका उद्योजका च्या व्यवसाय पुढे सामान्य नागरिकांची भवितव्य काहीच नाही असं चित्र उपोषणाला बसलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या मांडलेल्या विषयावर गांभीर्याने दखल घेतल्याची मागचे गुढ काय.. संबंधित क्रेशर मशीनवर अवैध गौण खनिज उत्खलन तक्रारी संदर्भात तत्कालीन तहसीलदार यांनी क्रेशर मशीन ला सिल ठोकले होते. कोट्यवधी रुपये बकाया असून ही नियमबाह्य सील तोडून क्रेशर मशीन सुरू आहे.. वेळोवेळी तक्रार करूनही संबंधित क्रेशर मशीन वर काहीच कारवाई होत नाही ह्या मागच गोड बंगाल काय....

# छत्रपती शिवाजी विद्यालयाचे एन एम एम एस शिष्यवृत्ती परीक्षेत उज्वल यशाची परंपरा कायम




**गणोरे : (समर्थ गांवकरी)**

एन एम एम एस शिष्यवृत्ती परिक्षेत गणोरे (ता.अकोले) येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालयाचे तीस उत्तीर्ण झाले अ सुन विद्यालयाचा ७५% शेकडा निकाल लागला आहे. या परीक्षेत ४० विद्यार्थी बसले होते. विद्यालयाची उज्वल यशाची परंपरा कायम ठेवलीआहे. राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये सोहम बाळासाहेब वाकचौरे , पलक परसराम आंबरे , रिया संजय आंबरे , साईच्छा प्रमोद आंबरे, विरेन सचिन आंबरे, अनमोल किरण दातीर, श्रीराज संभाजी भालेराव , समीक्षा श्रीकांत शिंदे यांनी विशेष प्राविण्य मिळावा मिळविले आहे.

त्यांना विभाग प्रमुख असवले सि एम, आंबरे एस एम, ढवळे डी डी, सातपुते एस एस, असवले सी एम यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापक आण्णासाहेब दिवे, स्थानिक स्कुल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, विकास समिती, शिक्षक, पालक व सर्व ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

# तूर हमीभाव नोंदणीला मुदतवाढ

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यासह जिल्ह्यातील सर्व तूर उत्पादक शेतकरी बांधवांना कळविण्यात येते की, हंगाम २०२५-२६ अंतर्गत तूर पिकाची शासकीय हमीभावाने (एम.पी.एसपी) खरेदी करण्यासाठी सुरू असलेल्या ऑनलाईन नोंदणीची मुदत आता २४ मार्च २०२६ पर्यंत वाढवण्यात आली असल्याची माहिती कृऊबासने दिली आहे. बाजारपेठेतील तुरीचे दर आणि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन राज्य शासनाने हा निर्णय घेतला आहे. ज्या शेतकरी बांधवांची नोंदणी तांत्रिक कारणास्तव किंवा इतर कारणांमुळे राहून गेली होती, त्यांनी या संधीचा लाभ घ्यावा. यासाठी चालू वर्षाचा ७/१२ उतारा (तूर पिकाची नोंद असलेला), आधार कार्डची छायाप्रत, बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायाप्रत (बँक खाते आधारशी लिंक असणे अनिवार्य), मोबाईल नंबर (ओटीपी पडताळणीसाठी) व जुनी मुदत २० फेब्रुवारी २०२६ (संपुष्टात आली होती). नवीन मुदत २४ मार्च २०२६ पर्यंत नजीकची शासकीय खरेदी केंद्रे किंवा अधिकृत ऑनलाईन पोर्टल वर करावी.

# पहिल्या 'संपूर्ण नैसर्गिक जिल्ह्या'तच कृषी व बागायती विभागाच्या निष्क्रियतेमुळे नैसर्गिक शेतीचा ऱ्हास



डांग दरबारसारख्या मोठ्या उत्सवांमध्ये मंचावरून नैसर्गिक शेतीचे गुणगान केले जाईल; परंतु जमिनीवरील अपयश संबंधित विभागांची पोलखोल करत आहे.०२ मार्च रोजी राज्यपाल आहवा येथील 'रंग उपवन' येथे उपस्थित राहणार असताना, ते या बिघडलेल्या परिस्थितीची दखल घेतील का? संबंधित विभागांवर कठोर कारवाई होईल का? की दरवर्षीप्रमाणे आश्वासनांची सरबत्ती आणि आकडेवारीचा खेळ करून विषय दडपला जाईल? डांगमधील जागरूक नागरिक आणि शेतकरी आता शासनाकडून ठोस आणि परिणामकारक कारवाईची मागणी करत आहेत.

**डांग-गुजरात : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्याच्या वैविध्यपूर्ण संस्कृतीचे प्रतीक असलेल्या ऐतिहासिक 'डांग दरबार–२०२६'चे भव्य आयोजन दिनांक २६/०२/२०२६ ते ०३/०३/२०२६ दरम्यान होणार आहे. या निमित्ताने ०२ मार्च रोजी गुजरातचे महामहिम राज्यपाल आचार्य देवव्रत हे विशेष उपस्थित राहून डांगच्या राजघराण्यांचा सन्मान करणार आहेत. राज्यपाल हे सातत्याने नैसर्गिक शेतीचे पुरस्कर्ते राहिले असून या मंचावरून ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

मात्र डांग जिल्ह्यातील सध्याची परिस्थिती पाहता "दिव्याखाली अंधार" अशी अवस्था निर्माण झाल्याचे चित्र आहे. गुजरातमधील पहिला 'संपूर्ण नैसर्गिक शेती जिल्हा' म्हणून घोषित झालेल्या डांगमध्येच शासकीय यंत्रणेच्या निष्क्रियतेमुळे हे अभियान केवळ कागदोपत्रीच मर्यादित राहिल्याचे दिसून येत आहे. जिल्हा कृषी विभाग, बागायती विभाग तसेच कृषी विद्यापीठांकडून शेतकरी प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा व जनजागृती अभियानांवर लाखो रुपयांचा खर्च दाखवला जात आहे. परंतु प्रत्यक्षात दुर्गम भागातील शेतकऱ्यांपर्यंत कोणतेही प्रभावी मार्गदर्शन पोहोचत नसल्याची तक्रार आहे. मध्यस्थांच्या माध्यमातून केवळ छायाचित्रे काढून सेमिनारचे दिखावे केले जात असल्याचा आरोप होत आहे. सातत्यपूर्ण फॉलो-अप आणि तांत्रिक सहाय्याच्या अभावामुळे शेतकरी संभ्रमात सापडले आहेत.

ज्या जिल्ह्याला अभिमानाने 'पहिला नैसर्गिक जिल्हा' घोषित करण्यात आले, त्याच ठिकाणी कृषी व बागायती विभागाच्या उदासीनतेमुळे नैसर्गिक शेतीचा ऱ्हास होत असल्याचे दिसते. राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या वैयक्तिक पुढाकाराला आणि शासनाच्या मिशनला स्थानिक अधिकाऱ्यांनी जणू हरताळ फासल्याची चर्चा आहे. योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने अनेक शेतकरी पुन्हा रासायनिक खते व कीटकनाशकांच्या वापराकडे वळत असल्याची माहिती मिळत आहे.

# होळीपूर्वी डांगमध्ये आदिवासी संस्कृतीचा अनोखा संगम

## 'भुरकुंडिया बाजार'मध्ये उसळली मानवी गर्दी

**डांग.गुजरात : (समर्थ गांवकरी)**

डांग जिल्ह्याचे प्रवेशद्वार मानल्या जाणाऱ्या वघई येथे होळीच्या पवित्र सणाच्या पूर्वसंध्येला पारंपरिक 'भुरकुंडिया बाजार' (होळी हाट) मोठ्या उत्साहात भरविण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही या हाटात लोकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाली. होळीला आता अवघे काही दिवस शिल्लक असताना डांगच्या दुर्गम भागांतून आदिवासी बांधव आपल्या आवडत्या सणाच्या तयारीसाठी मोठ्या संख्येने येथे दाखल झाले होते.

वघईसह परिसरातील अनेक ग्रामीण भागांतील नागरिकांनी जीवनावश्यक वस्तूंसोबतच होळीसाठी लागणारी पूजासामग्री, मिठाई आणि इतर साहित्याची खरेदी केली. संपूर्ण बाजारपेठेत उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते, ज्यामुळे डांगचा डोंगराळ परिसर अक्षरशः जिवंत झाला होता.

हा भुरकुंडिया बाजार केवळ खरेदी-विक्रीपुरता मर्यादित नसून डांगच्या समृद्ध आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारा सोहळा म्हणूनही ओळखला जातो. बाजारात आदिवासी समाजातील तरुण आणि ज्येष्ठ मंडळी पारंपरिक वेशभूषेत सहभागी झाली होती. वाद्यांच्या तालावर आणि लोकगीतांच्या गजरात 'फाग' (होळीची भेट) मागण्याची परंपरा त्यांनी जपली होती. हे दृश्य स्थानिक सांस्कृतिक ओळखीचे प्रतीक ठरले.

विविध भागांतील लहान-मोठ्या व्यापाऱ्यांनी आपल्या स्टॉल्सद्वारे खाद्यपदार्थ, खेळणी,



सजावटीच्या वस्तू आदींची विक्री केली. व्यापारी आणि ग्राहकांच्या गर्दीमुळे वघई शहर अक्षरशः मानवी समुद्राने फुलून गेले होते. सुरक्षेच्या दृष्टीनेही प्रशासन सतर्क होते. मोठ्या प्रमाणावर जनसमुदाय एकत्र आल्यामुळे कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी वघई पोलीस ठाण्याचे पी.आय. व्ही. के. गढवी यांच्या मार्गदर्शनाखाली कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. वाहतूक नियंत्रण आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी सातत्याने गस्त घातली.

शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात डांगकरांनी आपल्या संस्कृतीचा आणि परंपरेचा अभिमानाने उत्सव साजरा केला. बदलत्या काळातही डांगमधील आदिवासी समाज आपली परंपरा आणि सांस्कृतिक वारसा तितक्याच अभिमानाने जपून ठेवत असल्याचे या भुरकुंडिया बाजारातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले.

# कुकडी प्रकल्पात उपयुक्त साठा ६०.४६%; गतवर्षी ४५.४४%

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

कुकडी पाटबंधारे प्रकल्पातील आजचा धरणाचा उपयुक्त साठा ६० . ४६ % व मागील वर्षाचा उपयुक्त साठा ४५ . ४४ % आहे .चालू वर्षी धरणमध्ये पाणी पुरवठा मुबलक आहे यामुळे जुन्नरच्या आदिवासी भागामध्ये पाणीटंचाई भासणार नाही अशी चर्चा तालुक्यात सुरू आहे . कुकडी प्रकल्पातील पाटबंधारे विभागातील सर्व धरणांमधून सांडवा किंवा नदीद्वारे आज अखेर पाणी पात्र मध्ये सोडलेले नाही . यामुळे पाण्याचे उत्तम नियोजन झाले पाहिजे अशी मागणी आदिवासी भागातून आहे. डिंभे धरणातून शेतीसाठी डाव्या काव्यामधून ६७५ क्युमेक्स व उजव्या कालवा मधून ५० क्युमेक्स पाणी सोडण्यात आले आहे.

# मढ शाळेत शिवजयंती सोहळा विविध कार्यक्रमांनी साजरा



**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**

मौजे पारगाव तर्फे मढ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिवजयंतीच्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सुंदर हस्ताक्षर स्पर्धा,चित्रकला स्पर्धा,वक्तृत्व स्पर्धा,निबंध स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.तसेच सायंकाळी विद्यार्थ्यांच्या विविध गुणदर्शन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.त्यामध्ये शाळेतील ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेवून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारीत नृत्य सादर केले.तसेच पर्यावरण ,रुढी ,परंपरा ,चालीरिती यांवर लोकनृत्य सादर केली. मोबाईल वापरावर आधारीत नाटकदेखील सादर केले. शाळेतील लोकनृत्याचा पंचायत समिती आयोजित कार्यक्रमांमध्ये द्वितीय क्रमांक आल्याबद्दल जुन्नर तालुक्याचे आमदार सन्मा. शरददादा सोनवणे यांनी कौतुक करून सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. कार्यक्रमासाठी नवनियुक्त पं.स.सदस्या आशाताई डावखर,श्री. महेंद्रशेठ सदाकाळ,ग्रामपंचायतचे सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, शिक्षक प्रतिनिधी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सर्व सदस्य,क्रांती तरूण मंडळ,माता पालक संघ व ग्रामस्थ मंडळींनी केले.शाळेचे मुख्याध्यापक श्री.चंद्रकांत पारधी सर यांनी प्रास्ताविक केले.स्वागत उपशिक्षक नामदेव कोकाटे सर यांनी केले तर सुत्रसंचालन अविनाश मस्करे सर व निलेश चकवे सर यांनी केले.

# 'स्वारातीम' विद्यापीठात 'सेक्युलरिझम'वर विशेष व्याख्यान



**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'राज्यघटनेतील सेक्युलरिझमचा अर्थ' या विषयावर महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांचे विशेष व्याख्यान आयोजित होत आहे. हे व्याख्यान दि.२६ फेब्रुवारी, २०२६ रोजी दुपारी १२ वाजता विद्यापीठातील सामाजिकशास्त्र संकुलात होईल, अशी माहिती विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव प्रा. ज्ञानेश्वर पवार यांनी दिली.

प्रा. शेषराव मोरे यांनी नुकतेच भारतीय संविधानातील सेक्युलरिझमवर ग्रंथ लिहिला असून, या व्याख्यानात त्यांचे मौलिक विचार ऐकण्याची दुर्मीळ संधी मिळेल. या व्याख्यानसत्राचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. मनोहर चासकर असतील. प्र-कुलगुरू प्रा. अशोक महाजन आणि व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सर्वांनी या व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. दिलीप चव्हाण यांनी केले आहे.

# इंडिया इंटरनॅशनल मोटर शो २०२६ ची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इंडिया इंटरनॅशनल मोटर शो २०२६ ची (आयआयएमएस २०२६) घोषणा करण्यात आली आहे आणि त्यासोबतच भारतीय ऑटोमोटिव्ह उद्योग एका नवीन आणि मोठ्या स्तरावरील व्यासपीठाचा साक्षीदार होण्यासाठी सज्ज झाला आहे. या प्रदर्शनाची पहिली आवृत्ती २४ ते २६ एप्रिल २०२६ दरम्यान सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटर (वाशी, नवी मुंबई) येथे आयोजित केली जाईल. 'परसेप्ट ग्रुप' आघाडीच्या ऑटोमोटिव्ह उद्योग संघटनांच्या सहकार्याने इंडिया इंटरनॅशनल मोटर शोचे आयोजन करत आहे. इंडिया इंटरनॅशनल मोटर शो हा बी२बी आणि बी२सी अशा दोन्ही स्तरांवरील एक सर्वसमावेशक व्यासपीठ म्हणून ओळखला जातो. याचे उद्दिष्ट संपूर्ण वाहन इकोसिस्टिम एकाच छताखाली आणणे हे आहे. यामध्ये प्रवासी वाहने, व्यावसायिक वाहने, इलेक्ट्रिक आणि हायब्रीड वाहने, ऑटो पार्ट्स, ॲक्सेसरीज, ऑटो केअर, आफ्टरमार्केट सोल्यूशन्स, सर्व्हिस टेक्नॉलॉजी आणि इतर संलग्न सेवांचे भव्य प्रदर्शन भरवण्यात येईल. इंडिया इंटरनॅशनल मोटर शो २०२६ची रचना ही व्यावसायिक दृष्टिकोन असलेल्या 'इंडस्ट्री मार्केटप्लेस'च्या रूपात केली असून, त्याला मोठ्या प्रमाणावरील ग्राहक सहभागाची जोड असेल. या तीन दिवसांच्या कार्यक्रमात प्रमुख कंपन्यांचे नवीन लॉंचेस, भविष्यातील वाहनांचे प्रदर्शन, टायर-१ सोर्सिंग झोन्स, विशेष व्यावसायिक (बी२बी) बैठका, गुंतवणूकदारांशी संवाद आणि प्रत्यक्ष प्रात्यक्षिके पाहायला मिळतील. या व्यासपीठावर भारतभरातील वाहन उत्पादक, पुरवठादार, तंत्रज्ञान कंपन्या, स्टार्टअप्स, लघु व मध्यम उद्योजक, फ्लीट ऑपरेटर्स, गुंतवणूकदार, धोरणकर्ते आणि ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित राहतील.

परसेप्ट आयसीईच्या मुख्य कार्यकारी अधिकारी विद्या अल्वा म्हणाल्या, "इंडिया इंटरनॅशनल मोटर शो २०२६ हे संपूर्ण मोबिलिटी इकोसिस्टमसाठी एक प्रमुख केंद्र ठरेल, जिथे नाविन्यपूर्ण कल्पना व्यावसायिक संधींमध्ये रूपांतरित होतील. पश्चिम भारतातील जागतिक दर्जाच्या ऑटोमोटिव्ह व्यासपीठाची उणीव आम्ही योग्य वेळी ओळखली असून, नवी मुंबईतील सक्षम पायाभूत सुविधा आणि आमच्या अनुभवाच्या जोरावर हा शो भविष्यातील मोबिलिटीसाठी प्रभावी व्यासपीठ बनेल."" इंडिया इंटरनॅशनल मोटर शो २०२६ आंतरराष्ट्रीय प्रदर्शन मानकांनुसार बहुस्तरीय स्वरूपात आयोजित केला जाणार आहे. भव्य प्रदर्शनात नवीन वाहन लॉंचेस, अत्याधुनिक तंत्रज्ञान, यंत्रणा व सुटे भाग सादर केले जातील. यासोबत नियोजित 'नॉलेज कॉन्फरन्स'मध्ये धोरणकर्ते, जागतिक तज्ञ आणि उद्योग नेते स्थानिक उत्पादन, पुरवठा साखळी सक्षमता, स्वच्छ ऊर्जा संक्रमण, कनेक्टेड मोबिलिटी, सायबर सुरक्षा आणि जागतिक वाहननिर्मितीत भारताची वाढती भूमिका अशा महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करतील. या कार्यक्रमात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, शाश्वतता, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन, सेवा तंत्रज्ञान आणि आफ्टरमार्केट वृद्धी यांवर विशेष कार्यशाळा व 'मास्टर क्लासेस' आयोजित केले जातील. नियोजित बी2बी बैठकींद्वारे खरेदीदार, विक्रेते, उत्पादक, पुरवठादार आणि गुंतवणूकदारांना थेट संवादाची संधी मिळेल.

तसेच ग्राहक आणि वाहनप्रेमींसाठी लाईव्ह टेस्ट-ड्राईव्ह ट्रॅक, ईव्ही चार्जिंग प्रात्यक्षिके आणि इंटरॲक्टिव्ह प्रॉडक्ट स्टुडिओ उपलब्ध असतील, ज्यामुळे उदयोन्मुख वाहतूक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येईल. या उपक्रमाला पाठिंबा देणाऱ्या ज्येष्ठ इंडस्ट्री लीडर्समध्ये आरती नीमकर (अध्यक्षा, आयईडीए), दीपक नाईक (अध्यक्ष, एमबीएमएस), मलिक पटेल (अध्यक्ष, एफओटीटीओ), मोहन गोयल (विभागीय अध्यक्ष, आयटीटीटीए), मनप्रीत सिंग (अध्यक्ष, आयसीआयबी), विजय कलंत्री (अध्यक्ष, एआयएआय) आणि चंद्रकांत साळुंखे (अध्यक्ष, एसएमई चेंबर ऑफ इंडिया) यांचा समावेश आहे.

नवी मुंबईचा व्यापारी व पायाभूत सुविधा केंद्र म्हणून वेगाने होत असलेला विकास लक्षात घेऊन या प्रदर्शनासाठी यजमान शहर म्हणून तिची निवड करण्यात आली आहे. नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ, सिडकोकडून करण्यात आलेल्या वाहतूक सुधारणा आणि वाढती 'लास्ट माईल कनेक्टिव्हिटी' यामुळे मोठ्या प्रमाणावरील प्रदर्शनासाठी आवश्यक सुविधा व सुलभ ये-जा सुनिश्चित झाली आहे. यामुळे पश्चिम भारतात जागतिक दर्जाच्या ऑटोमोटिव्ह प्लॅटफॉर्मची दीर्घकालीन उणीवही भरून निघणार आहे.

# आढळगावमध्ये ५४८-डी राष्ट्रीय महामार्ग व वीज प्रश्नावर उपोषण तात्पुरते स्थगित

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



आढळगाव येथे ५४८-डी राष्ट्रीय महामार्गाच्या रखडलेल्या कामाविरोधात तसेच गावातील विजेच्या प्रश्नाबाबत ग्रामपंचायतीचे सरपंच श्री शिवप्रसाद भाऊसाहेब उबाळे हे गेल्या तीन दिवसांपासून श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज ओट्यावर आमरण उपोषणास बसले होते.

या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्री निलेश लंके यांनी आज उपोषणस्थळी भेट देत संबंधित राष्ट्रीय महामार्ग विभागाचे अधिकारी व ठेकेदारांना तातडीने पाचारण केले. त्यांनी रखडलेली कामे त्वरित सुरू करण्याबाबत स्पष्ट सूचना दिल्या. तसेच महावितरणच्या अधिकाऱ्यांनाही बोलावून गावातील विजेच्या समस्येवर तत्काळ तोडगा काढण्याचे निर्देश दिले. त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली.

खासदार लंके यांनी काम पूर्णत्वास नेण्याबाबत स्वतः हमी घेतली. आढळगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज यात्रेपूर्वी सर्व महत्त्वाची कामे पूर्ण करण्यात येतील, असे लेखी आश्वासन राष्ट्रीय महामार्ग विभाग व महावितरणच्या अधिकाऱ्यांनी खासदारांच्या उपस्थितीत दिले.

खासदारांच्या शब्दावर विश्वास ठेवून सरपंच उबाळे यांनी आपले उपोषण तात्पुरते स्थगित करत मागे घेतले.

यावेळी माजी सभापती विलासराव भैलूमे, श्री हरिदास आबा शिर्के, श्री संजय लाकुडझोडे, चेअरमन श्री दत्ताभाऊ चव्हाण, श्री रघुनाथ सूर्यवंशी, श्री हनुमंत डोके, श्री अंबादास चव्हाण, श्री तुकाराम वाकडे, पत्रकार श्री अमोल गव्हाणे, श्री माऊली उबाळे, श्री सागर वाकडे, श्री शाम भालेराव, श्री अल्फा शिंदे, शुभम गव्हाणे, श्री सतिश औटी, श्री जगधने, श्री अमोल डाळिंबे, पै. सिद्धार्थ कांबळे, श्री सुनील छत्तीसे, श्री पिनू भैलूमे, श्री बाळासाहेब बंड, श्री बबन आबा काळे, श्री निलेश डाळिंबे, श्री प्रेमदास उबाळे, श्री गणेश गाढवे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

"जर काम पुन्हा बंद पडले किंवा माझी फसवणूक झाल्याचे वाटले, तर राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता श्री शेवाळे यांच्या दालनात आत्मदहन करण्याचा इशारा देतो," असे सरपंच श्री शिवप्रसाद भाऊसाहेब उबाळे यांनी स्पष्ट केले.

# महाराजा कॉलेजची पैलवान श्रुतिका पवार ठरली २०२६ ची महिला शिरूर केसरी

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**



कोरेगाव येथे दिनांक २० ते २२ फेब्रुवारी दरम्यान पार पडलेल्या शिरूर केसरी २०२६ कुस्ती स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, कर्मयोगी कुस्ती संकुल पारगाव तसेच चिंचणी गावची पैलवान श्रुतिका पवार हिने उल्लेखनीय कामगिरी करत महिला शिरूर केसरी किताब पटकावला.

महिला खुल्या गटात श्रुतिकाने अत्यंत दमदार आणि प्रेक्षणीय अशा चार कुस्त्या जिंकत यंदाच्या शिरूर केसरीचा बहुमान मिळविला. या विजेतेपदाबद्दल तिला इलेक्ट्रिक स्कुटी, चांदीची गदा आणि १५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक प्रदान करण्यात आले.

श्रुतिकाच्या या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन तथा माजी आमदार बबनराव पाचपुते, विकास समिती सदस्य बाबासाहेब भोस, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी आमदार राहुल जगताप, महावीर पटवा, प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, पर्यवेक्षक रत्नकर झिटे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, जिमखाना प्रमुख प्रा. रमेश थोरात, क्रीडा समितीचे चेअरमन प्रा. श्रीकांत थोरात, विभाग प्रमुख प्रा. रमेश भुजबळ, प्रा. उषा बोरुडे, कार्यालय प्रमुख राऊत सर तसेच सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले.

या यशासाठी तिला कोच रवी बोत्रे, वडील भरत पवार, क्रीडा शिक्षक संजय डफळ आणि क्रीडा संचालिका कल्पना बागुल यांचे मार्गदर्शन लाभले.

# दिव्यांग जोडप्याचा विवाह संपन्न

## छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त चिखली येथे सामाजिक उपक्रम



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून श्रीगोंदा तालुक्यातील चिखली येथे दिव्यांग जोडप्याचा विवाह सोहळा उत्साहात आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. साखळी देवी प्रसन्न मंदिर परिसरात जाधव परिवारातील कन्या आणि सोनवणे परिवारातील चिरंजीव या दोघांचा विधीपूर्वक विवाह लावण्यात आला. विशेष म्हणजे वधू-वर दोघेही दिव्यांग असून, समाजाच्या सहकार्याने हा सोहळा पार पडला. या विवाहासाठी श्रीगोंदा शहरातील चौधरी सेंटरचे मालक चंद्रकांत चौधरी यांनी पुढाकार घेत आर्थिक व व्यवस्थापनाची जबाबदारी स्वीकारली. त्यांच्या सहकार्यामुळे हा मंगल सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी गोपीचंद लबडे, राजेंद्र पोकळे, डॉ. सोमनाथ देवकाते, शिराज शेख, मच्छिंद्र पाटोळे, शशिकांत म्हस्के, शशिकांत आंधळकर, बाळासाहेब पिपाडा, रियाज शेख, छबुलाल बाबा, सय्यद नाना कोळपे, श्री. भोसले, परेश वाबळे, बाबा घोडके, नारायण शिरसागर, सचिन ढोले, संदीप नय्यर, अमोल भागवत, नवनाथ होले, गणेश कळसकर, अमोल घोडके तसेच दिव्यांग संघटनेचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

तसेच पवित्र साकळाई माता देवी मंदिराचे पुजारी, गावचे सरपंच, ग्रामसेवक आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक एकोप्याचे दर्शन घडवणारा हा विवाह सोहळा परिसरात कौतुकाचा विषय ठरला.

# दोन दिवसीय संगीत महोत्सवाचे आयोजन

**वैजापूर : (समर्थ गांवकरी)**

येथील ज्ञानेश संगीत विद्यालयाच्यावतीने दोन दिवस वैजापुर संगीत महोत्सव व गुरुपुजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती आयोजकांनी दिली. मातोश्रीनगर लाडगांव रोड येथील ज्ञानेश संगीत विद्यालयात आयोजित संगीत महोत्सवात शनिवार दि. २८ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ ते ७ या वेळेत विद्यालयातील विद्याथ्याचे गायन व वादन होणार असून रविवार दि. १ मार्च रोजी दुपारी ३ ते ७ या वेळेने भजनसंध्या हा कार्यक्रम होणार असून या प्रसंगी तबला अलंकार (आळंदी देवाची) गुरुवर्य सच्चिदानंद फुलसरे व संत बहिणाबाई संगीत विद्यालय शिवूर येथील गुरुवर्य प्रभाकर महाराज चन्ने यांचे गुरुपुजन होणार आहे.

विष्णुपुरी नांदेड येथे संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव व धारूमाता मंदिर वर्धापनदिन निमित्ताने

# अखंड हरिनाम सप्ताह व श्री राम कथा सोहळ्याचे आयोजन

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**





मौजे विष्णुपुरी ता.जि.नांदेड येथे संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव व धारुमाता मंदिर वर्धापन दिना निमित्त अखंड हरीनाम सप्ताह व श्रीराम कथा सोहळाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संतश्रेष्ठ जगद्‌गुरु तुकाराम महाराज बिजोत्सव व धारुमाता मंदिर वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त मौ.विष्णुपूरी येथे दिनांक 27 फेब्रुवारी ते 6 मार्च दरम्यान पर्यंत वै. ह.भ.प. मामासाहेब मारतळेकर, काळबा महाराज हरबळकर, माणिक महाराज सिडको यांच्या कृपा आशिर्वादाने तसेच ह.भ.प. राजेजी महाराज, हनुमान मंदिर पुजारी, विष्णुपूरी, यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह, गाथा पारायण व श्रीराम कथा सोहळा आयोजित केलेला आहे.श्रध्दास्थान हभप राजेजी महाराज ,हनुमान मंदिर पुजारी व श्री शिवलींग महाराज ढणमने,श्री संतश्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज मंदिर पुजारी यांच्या आशीर्वादाने 31 व्या वर्षी सप्ताहाचे आयोजन केले आहे.

दैनंदिन कार्यक्रम पहाटे काकडा,आरती, गाथा भजन, रामकथा दु.12ते 4 सायं.6ते 7 हरीपाठ,रात्री 8ते 10 हरीकिर्तन होईल, तर सप्ताह मध्ये रात्री हभप. मधुकर महाराज बारूळकर हभप. श्रीधर महाराज कासराळीकर,हभप. अशोक महाराज इदगे आळंदीकर ,हभप.आत्माराम महाराज पोलीसवाडी ,हभप.योगेश महाराज वसमतकर यांच्ये पौर्णिमा (धुलिवंदन), निमित्ताने हभप. अ‍ॅड यादव महाराज वाईकर,हभप किरण महाराज सोनखेडकर यांचें 6 मार्च रोजी काल्याचे किर्तन ह.भ.प. विश्वनाथ महाराज काकांडीकर यांचे सकाळी 9 ते 11 होईल,दिनांक 5 मार्च रोजी संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या बिज उत्सवानिमित्त सकाळी दहा ते बारा गुलालाचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसादास सुरुवात होईल.

सदरील सोहळा श्री संतश्रेष्ठ जगद्‌गुरु तुकाराम महाराज मंदिर दुर्गावाडा, विष्णुपूरी येथे आयोजित करण्यात आला आहे,या सोहळ्याला भाविक भक्त यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समस्त गावकरी मंडळी विष्णुपूरी ता.जि. नांदेड यांनी केले आहे.

# कर्जमाफीच्या संभ्रमामुळे सहकारी सोसायट्यांची वसुली ठप्प

## शासनाने निकष जाहीर करावेत – गणेश रेवगडे

**(समर्थ गांवकरी)**



राज्यातील प्राथमिक कृषी सहकारी सोसायट्यांच्या कर्जवसुलीवर यंदा थेट परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्यात कर्जमाफीच्या चर्चा सुरू असताना शासनाकडून कर्जमाफीच्या अटी व नियमांबाबत स्पष्टता नसल्याने चालू कर्जदार तसेच थकबाकीदार सभासदांनी वसुलीबाबत स्तब्ध भूमिका घेतली आहे. कर्जमाफी नेमकी कोणासाठी आणि कोणत्या निकषांवर लागू होणार, हा प्रश्न अद्याप अनुत्तरित असल्याने शेतकरी व सोसायट्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या अनिश्चिततेचा थेट परिणाम संस्थांच्या कर्जवसुलीवर होत असून अनेक ठिकाणी वसुलीची गती मंदावली आहे. परिणामी सहकारी संस्थांचे आर्थिक संतुलन बिघडण्याची भीती व्यक्त होत आहे. काही संस्थांचे अस्तित्वच धोक्यात येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

खरीप पिकांच्या कर्जाची अंतिम वसुली तारीख ३१ मार्च अशी असते. वेळेत कर्जफेड केल्यास शेतकऱ्यांना डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेचा लाभ मिळतो. दरवर्षी फेब्रुवारी–मार्च महिन्यात शेतकऱ्यांची कर्जफेडीची लगबग दिसून येते. मात्र यंदा कर्जमाफीबाबत अर्धवट माहिती आणि स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे नसल्याने "नेमके काय करावे?" असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. परिणामी सहकारी सोसायट्यांमध्ये सध्या शांतता व अनिश्चिततेचे वातावरण आहे.

कर्जमाफीच्या निकषांबाबत स्पष्टता नसल्याने सचिवांना शेतकरी सभासदांच्या प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. परंतु शासनाकडून कोणत्याही प्रकारच्या अधिकृत सूचना न मिळाल्याने सचिवांचीही कोंडी झाली आहे. संस्था वाचविण्यासाठी कर्जवसुलीचा आग्रह धरला तर शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागते, आणि शांत बसल्यास संस्था डबघाईला जाण्याची भीती निर्माण होते. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी सचिव संघटनेचे अध्यक्ष गणेश रेवगडे यांनी शासनाने कर्जमाफी संदर्भातील निकष तातडीने जाहीर करावेत, अशी मागणी केली आहे. यामुळे मुदतीत कर्जफेड करणाऱ्या सभासदांना व्याज सवलतीचा लाभ घेता येईल तसेच सोसायट्यांनाही योग्य मार्गदर्शन मिळेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील सहकारी संस्थांचे आर्थिक आरोग्य टिकवण्यासाठी शासनाने लवकरात लवकर ठोस भूमिका जाहीर करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज पारायण सोहळ्याची भक्तिमय सांगता

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा शहराचे ग्रामदैवत सद्गुरु श्री संत शेख महंमद महाराज यांच्या यात्रेनिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज पारायण सोहळा गेल्या आठ दिवसांपासून भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या धार्मिक सोहळ्याची सांगता पारंपरिक काल्याच्या कीर्तनाने अत्यंत उत्साहात आणि भक्तिभावपूर्ण वातावरणात करण्यात आली. कार्यक्रमास मान्यवरांसह श्रीगोंदा शहरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रताप भैय्या पाचपुते यांनीही यावेळी उपस्थिती दर्शवली. दरम्यान, काही दिवसांपूर्वी संत शेख महंमद महाराज यांच्या अश्वाची प्रकृती बिघडली होती.

# दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली; 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' उपक्रमातून १६ मे.टन धान्य संकलित

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्याच्या हेतूने अग्रीपंख फाउंडेशनच्या वतीने तालुक्यातील तब्बल ७० शाळा व विद्यालयांमध्ये 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' हा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून सुमारे १६ मेट्रिक टन धान्य संकलित करण्यात आले असून, त्यातून अनेक अनाथ व वंचित घटकांच्या भुकेची भागवणूक होणार आहे.

घारगाव येथे आयोजित कार्यक्रमात नागवडे साखर कारखान्याचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. विद्यार्थीदशेतच मुलांमध्ये दातृत्वाची भावना आणि वंचित समाजाविषयी संवेदनशीलता निर्माण होणे आवश्यक आहे. 'एक मुठ धान्य अनाथांसाठी' हा उपक्रम त्या दृष्टीने प्रेरणादायी आणि परिणामकारक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

घारगाव येथील श्री यशवंतराव चव्हाण विद्यालयात या उपक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी संत गाडगे बाबा तसेच दिवंगत अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात नागवडे साखर कारखान्याचे संचालक शरद जगताप आणि जिजाराम खामकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सचिन लगड यांनी केले.

यावेळी मधुकर पवार, सुभाष (काका) जगताप, उपसरपंच सुनील बांदल आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन रवींद्र भोंडवे यांनी केले, तर आभार प्रदर्शन मधुकर नागवडे यांनी मानले.

विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून उभारलेली ही धान्यपेढी समाजातील सामाजिक बांधिलकी अधिक दृढ करणारी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# 'झी' तर्फे नॅशनल झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्टची घोषणा

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

संस्कृती, सर्जनशीलता आणि व्यापकतेवर आधारित भविष्योन्मुख कॉन्टेन्ट इकोसिस्टम उभारण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधिक बळकटी देत 'झी' तर्फे झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्ट – या आपल्या प्रकारच्या अशा पहिल्याच, उद्योगांची व्याख्या करणाऱ्या संपूर्ण भारतभर राबवल्या जाणाऱ्या ओम्नीचॅनेल उपक्रमाच्या शुभारंभाची घोषणा करण्यात आली आहे. देशभरातील नवोदित चित्रपट निर्मिती प्रतिभेचा शोध घेऊन त्यांचे संगोपन करणे आणि त्यांची कला साजरी करणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. देशातील विविध क्षेत्रांमध्ये आपली वेगळी ओळख प्रस्थापित केलेले फिल्ममेकर्स एकाच राष्ट्रीय व्यासपीठावर एकत्र आणत, ही स्पर्धा भारतीय मनोरंजन क्षेत्रातील सर्वात महत्त्वाकांक्षी बहुभाषिक कलागुण शोध उपक्रमांपैकी एक ठरत आहे. खरोखरच सर्वसमावेशक दृष्टीकोनातून राबवलेल्या या उपक्रमात हिंदी, मराठी, बंगाली, तेलुगू, तामिळ, मल्याळम आणि कन्नड अशा सात प्रमुख भाषांचा समावेश असून विविध सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि चित्रपट परंपरांतील कथाकथनकारांना ह्या उद्योगातील दिग्गजांच्या पाठबळासह राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे. झी शॉर्ट फिल्म कॉन्टेस्टच्या केंद्रस्थानी विविध चित्रपट उद्योगांतील कथाकथनाला नवी दिशा देणाऱ्या दिग्गज दिग्दर्शकांचे प्रभावी परीक्षक पॅनल आहे. प्रथमच आपापल्या प्रादेशिक चित्रपट चळवळीचे नेतृत्व करणारे आणि स्वतंत्र कथाकथन शैली घडवणारे दिग्गज दिग्दर्शक एका व्यासपीठावर एकत्र आले असून नवोदित प्रतिभेला मार्गदर्शन व संधी देण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे.

# शिवरायांच्या विचारांची ज्योत अंगीकारावी : राजेंद्र नागवडे

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**




शिवरायांच्या धगधगत्या ज्योतीबरोबर त्यांचे धगधगते विचारही जीवनात अंगीकारले, तर महाराष्ट्रात शिवरायांना अपेक्षित असलेले स्वराज्य उभे राहिल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांनी व्यक्त केला.

वांगदरी येथील श्री छत्रपती ग्रुपच्या वतीने शिवजयंतीनिमित्त शिवरायांचे जन्मस्थान किल्ले शिवनेरी ते वांगदरी अशी ज्योत आणण्यात आली. या ज्योतीचे वांगदरी येथे स्वागत करताना नागवडे बोलत होते.

ते पुढे म्हणाले, शिवरायांनी रयतेचे राज्य स्थापन केले. स्वराज्यातील प्रत्येक कुटुंब हे माझे कुटुंब आहे आणि प्रत्येक सदस्य हा माझ्या कुटुंबातील घटक आहे, या भावनेतून त्यांनी राज्यकारभार केला. त्यामुळे अठरा पगड जातीतील लोकांना राजे आपले वाटत होते. त्यांच्याविषयी प्रचंड विश्वास निर्माण झाल्यामुळे कोणत्याही भौतिक सुविधा नसतानाही मावळे शिवाजी महाराजांच्या सैन्यात सामील झाले आणि प्राणपणाने साथ दिली. याच निष्ठेमुळे महाराजांना अलौकिक व अविस्मरणीय स्वराज्याची उभारणी करता आली. आजच्या तरुणांनीही शिवाजी महाराजांचा तोच जाज्वल्य विचार आचरणात आणला, तर शिवरायांना अपेक्षित समाजरचना निश्चितच उभी राहू शकते, असेही त्यांनी नमूद केले.

या प्रसंगी पंचायत समितीचे माजी सदस्य विठ्ठल आप्पा नागवडे, खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक साहेबराव महानोर, सरपंच सुजाता नागवडे, माजी सरपंच आदेश नागवडे, संजय काका नागवडे, शिवाजी चोरमले, मारुती मदने, अशोक मासाळ, मुख्याध्यापक बापूराव भिसे, विष्णू आबा मोहिते, काशिनाथ पारखे, आप्पा टुले, हनुमंत काटे, विजय नागवडे, रामचंद्र गवळी यांच्यासह वांगदरी गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्रा. योगेश शेलार यांनी प्रेरणादायी व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक किरण नागवडे यांनी केले, तर आभार सरपंच सुजाता नागवडे यांनी मानले. माजी सरपंच आदेश नागवडे यांनी उपस्थितांसाठी स्नेहभोजनाची व्यवस्था केली.